cmyk

दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१४५ | शुक्रवार दि.१४ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## सोयाबीन बियाण्यांच्या तक्रारींचा १७ हजारांचा आकडा

# महाबीजवर कारवाई का नाही?

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांनी यंदा मोठा धक्का दिला असून, बियाणे न उगवल्याच्या तब्बल १७ हजार ४७३ तक्रारी कृषी विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींच्या तपासणीत १ हजार ८२ बियाण्यांचे नमुने अप्रमाणित आढळले असून, संबंधित कंपन्यांविरोधात आतापर्यंत ८५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मात्र, सरकारी कंपनी असलेल्या महाबीजविरोधात एकही गुन्हा दाखल न झाल्याने कृषी विभागाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**



महाबीजच्या बियाण्यांबाबतही सुमारे एक हजारांहून अधिक तक्रारी प्राप्त झाल्याची माहिती आहे. त्यानंतर झालेल्या तपासणीत ५० हून अधिक नमुने अप्रमाणित आढळल्याचा दावा करण्यात येत आहे. असे असतानाही महाबीजविरोधात गुन्हा दाखल झालेला नाही. त्यामुळे 'सरकारी कंपनी असल्याने महाबीजला अभय दिले जात आहे का?' असा सवाल उपस्थित होत आहे. सोयाबीन बियाणे न उगवल्याच्या १७ हजार ४७३ तक्रारींनंतर तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांकडून तपासणी करण्यात आली. त्यापैकी १० हजार ▶▶ पान २ वर

### दोषी आढळल्यास कारवाई–कृषीमंत्री

दरम्यान, महाबीज सरकारी कंपनी असली तरी चौकशीत दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी स्पष्ट केले आहे. कंपनी सरकारी असो किंवा खासगी, बियाणे निकृष्ट आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, अशी भूमिका त्यांनी मांडली. मात्र, महाबीजच्या बियाण्यांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी आणि अप्रमाणित नमुने आढळूनही अद्याप गुन्हा दाखल झालेला नसल्याने 'कारवाईचे निकष सर्व कंपन्यांसाठी समान आहेत का?' हा प्रश्न कायम आहे. आता महाबीजच्या बियाण्यांबाबतच्या तक्रारींची चौकशी निष्पक्षपणे करून दोषींवर कारवाई होणार का, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



### आरएसएसच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचेही रक्षण करेन

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत केलेल्या एका विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर बोलताना त्यांनी आरएसएसलाही आपले विचार मांडण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले. ''ज्या दिवशी आरएसएसची अभिव्यक्ती दाबण्याचा प्रयत्न केला जाईल, त्या दिवशी मी त्यांचे रक्षण करेन. कारण त्यांनाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे,'' असे राहुल गांधी यांनी म्हटले.

आपला उद्देश कोणालाही बोलण्यापासून रोखण्याचा नसून, प्रत्येकाला 'फ्रीडम ऑफ एक्सप्रेशन' मिळाले पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या उद्घोषणा करा

मुंबई: छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथून येणाऱ्या–जाणाऱ्या प्रत्येक रेल्वेगाडीत ''छत्रपती शिवाजी महाराज की जय'' आणि 'जय भवानी, जय शिवाजी' अशा उद्घोषणा करण्यात याव्यात, अशी मागणी महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दिल्ली दौऱ्यावर असतांना केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेत विधानसभा अध्यक्ष यांनी पत्र दिले. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हे केवळ देशातील महत्वाचे ऐतिहासिक रेल्वे स्थानक नसून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्य, स्वराज्य आणि राष्ट्रभक्तीच्या विचारांचे प्रतीक आहे. या स्थानकाला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात आले असून, देशभरातून दररोज हजारो प्रवासी या स्थानकावरून प्रवास करतात. त्यामुळे रेल्वे प्रवासाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि पराक्रमाचा संदेश देशभर पोहोचविण्याच्या दृष्टीने ही उद्घोषणा महत्त्वपूर्ण ठरेल, असे नार्वेकर यांनी पत्रात नमूद केले आहे.

### शक्तीपीठ मार्गाविरोधात २१ ऑगस्टला 'यल्गार' मोर्चा

सांगली: शक्तीपीठ महामार्गामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी जाण्याबरोबरच ग्रामीण संस्कृती आणि शेती व्यवस्था उद्ध्वस्त होण्याचा धोका असल्याचा आरोप करत या प्रकल्पाविरोधातील आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यात आली आहे. माजी खासदार तथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली २१ ऑगस्ट रोजी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयावर विराट 'यल्गार' मोर्चा काढण्यात येणार आहे. विटा येथील श्रेयस भवन येथे शक्तीपीठ महामार्गविरोधी आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी व्यापक बैठक झाली. या बैठकीस राजू शेट्टी यांच्यासह दीपक लाड, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत चव्हाण, गजानन सुतार, राजेंद्र जगताप तसेच बाधित गावांतील शेतकरी आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### १० न.पं.आणि परिषदांच्या विकास आराखड्यांना मंजुरी

मुंबई: राज्यातील शहरी भागांचा सुनियोजित विकास व्हावा, यासाठी राज्य शासनाने विशेष पावले उचलली आहेत. याच अनुषंगाने उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील विविध १० नगरपंचायतींच्या विकास आराखड्यांना मंजुरी दिली आहे. यामुळे या नगरपरिषदांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. गेल्या वर्ष दीड वर्षात राज्य शासनाने सुमारे १०० पेक्षा अधिक शहरांच्या विकास योजनांना मान्यता दिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंजूर केलेल्या विकास आराखड्यांमध्ये जिवती (चंद्रपूर), शिरूर अनंतपाळ, रेणापूर (लातूर), सोयगाव (छत्रपती संभाजीनगर), पालम (परभणी), उमरखेड (यवतमाळ), बीड, कोरपना, गडचांदूर (चंद्रपूर) आणि पुलगाव (वर्धा) यांचा समावेश आहे.

# लाडक्या बहिणींसाठी पुन्हा वळवला सामाजिक न्याय विभागाचा निधी

## जुलैच्या हप्त्यासाठी ३१९ कोटी निधी मंजूर, रक्षाबंधनापूर्वी मिळणार हप्ता

मुंबई । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पुन्हा एकदा राज्य सरकारने सामाजिक न्याय विभागाचा निधी वळवला आहे. या योजनेंतर्गत जुलै महिन्याचा हप्ता लाभार्थी महिलांना देण्यासाठी अनुसूचित जाती घटकांतर्गत ३१९.५३ कोटी रुपयांचा निधी महिला व बाल विकास विभागाला वितरित करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. यामुळे रक्षाबंधनापूर्वी लाभार्थी महिलांना जुलैचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**



सदर निधी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर वितरित करण्यात आला आहे. सद्यस्थितीत नोंदणी झालेल्या लाभार्थ्यांची छाननी करुन पात्र लाभार्थी महिलांना लाभ देण्यात येत असल्याची खात्री करावी, असे महिला व बाल विकास विभागाला सांगण्यात आले आहे. या योजनेंतर्गत पात्र महिला लाभार्थ्यांना दर महिन्याला दीड हजार रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. यासाठी लाभार्थी महिलांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांहून कमी असायला हवे. दरम्यान, या योजनेतून ३८ टक्के म्हणजेच ९२ लाखांहून अधिक नावे वगळण्यात आली आहेत. या योजनेची पडताळणी सप्टेंबरपासून सुरु करण्यात आली होती. या पडताळणीनंतर लाखो लाडक्या बहिणींना अपात्र करण्यात आले. यातील बहुतांश महिलांनी ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. कुटुंबाचे उत्पन्न अधिक असणे, सरकारी कर्मचारी असणे आदी कारणे देऊन महिलांचा लाभ बंद करण्यात आला आहे. ज्या महिलांच्या अर्जात त्रुटी आढळून आल्या; तसेच ज्यांची ई–केवायसी प्रक्रिया अपूर्ण आहे, अशा महिलांना ई–केवायसी दुरुस्ती करण्यासाठी अतिरिक्त कालावधी सरकारने दिला होता. लाडकी बहीण योजनेसाठी महिलांना ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पुन्हा संधी दिली जाईल, असे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याआधी दिले होते. पण अद्याप यावर सरकारने कोणताही निर्णय घेतलेला नाही.

## जरांगे यांची टिका बावनकुळे भाऊक

पुणे । प्रतिनिधी



सध्या कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरून मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी भाजप नेते आणि राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना चांगलंच फैलावर घेतले आहे. नुकतेच जरांगे यांचा पश्चिम महाराष्ट्र दौरा पार पडला. या दौऱ्यातील सभांमध्ये मनोज जरांगे यांनी बावनकुळे यांचा कधी एकेरी उल्लेख करत टीका केली,तर कधी दिसण्यावरून व्यंगात्मक टीका केली. जरांगे यांच्याकडून होणाऱ्या सततच्या टीकेला आज अखेर चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. मात्र जरांगेंच्या टीकेला उत्तर देताना चंद्रशेखर बावनकुळे हे भावुक झाल्याचं पाहायला मिळालं.मनोज जरांगे यांच्या टीकेवर चंद्रशेखर बावनकुळे यांना विचारले असता ▶▶ पान २ वर

## महाराष्ट्रातील दहा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव !

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**भारतीय कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राची समृद्ध परंपरा अधोरेखित करणाऱ्या महाराष्ट्रातील दहा मान्यवर कलावंतांचा संगीत नाटक अकादमी पुरस्काराने राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वर्ष २०२४ आणि २०२५ चे संगीत नाटक अकादमी शुक्रवारी पुरस्कार प्रदान करण्यात आले.**

नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित या दिमाखदार सोहळ्यास केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, राव इंद्रजीत सिंह, विवेक अग्रवाल आणि संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्रातील कलावंतांनी हिंदुस्तानी शास्त्रीय गायन, अभंग गायन, अभिनय, पारंपरिक रंगभूमी, लोकनृत्य, नृत्य संशोधन, शहनाई वादन, दिग्दर्शन, नाट्यसंगीत आणि कथक अशा विविध कलाप्रकारांत केलेल्या प्रदीर्घ व

संगीत नाटक अकादेमी Sangeet Natak Akademi
NATIONAL ACADEMY OF MUSIC, DANCE AND DRAMA

उल्लेखनीय योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली. वर्ष २०२४ च्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील सहा कलावंतांचा समावेश आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय गायनासाठी अरुण कशाळकर, अभंग गायनासाठी आनंद भाटे, अभिनयासाठी अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमीसाठी मुकुंद मराठे, लोकनृत्यासाठी सुभाष नारायण नकाशे आणि नृत्य क्षेत्रातील संशोधनासाठी शुभदा वरदकर यांना संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वर्ष २०२५ च्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील चार मान्यवर कलावंतांना गौरविण्यात आले. शहनाई वादनासाठी शैलेश भागवत, ▶▶ पान २ वर

## पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री बादल यांच्यावर नांदेडात तलवारीने हल्ला



नांदेड । प्रतिनिधी

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष सुखबीरसिंह बादल यांच्यावर गुरुवारी नांदेड येथील प्रसिद्ध सचखंड गुरुद्वारा परिसरात एका अज्ञात इसमाने तलवारीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. या अचानक झालेल्या हल्ल्यात बादल यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली असून, त्यांना तातडीने उपचारासाठी शहरातील यशोसाई रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१३ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७४.५० क्विंटल | २,५९० | २,८०० | २,६५३ |
| ज्वारी/हायब्रिड: ८३.०० क्विंटल | २,००० | ४,२८० | २,८९० |
| मका/लोकल: ५.०० क्विंटल | २,४५३ | २,४५३ | २,४५३ |
| तूर : २.५० क्विंटल | ६,७५० | ७,००० | ६,८७५ |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ९३.०० क्विंटल | २,२०० | २,८०० | २,६२० |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: १०.०० क्विंटल | ६,८०० | ६,८०० | ६,८०० |
| हरभरा: १२.५० क्विंटल | ५,१०० | ६,००१ | ५,४९४ |

# चंद्रचूड यांच्या घटनापीठाने दिलेल्या निकालाचा फेरविचार व्हावा

## उद्धव ठाकरे यांचे वकिल कपील सिब्बल यांची मोठी मागणी

दिल्ली । वृत्तसंस्था

**शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादावर सुरू असलेल्या सुनावणीमध्ये मोठा ट्विस्ट आला आहे. या आधी माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या पाच न्यायालयाच्या घटनापीठाने शिवसेनेच्या बाबतीत जो निर्णय दिला आहे, त्याचा फेरविचार करावा अशी मोठी मागणी ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला. घटनापीठाच्या त्या निर्णयामुळे निवडणूक आयोगाला अधिकार मिळाला आणि त्यांनी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांना दिली. त्यामुळे त्या निर्णयावर सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने फेरविचार करावा, असी मागणी कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात केली.**

शिवसेना पक्ष आणि चिन्हाची लढाई आता अंतिम टप्प्यात असून ठाकरेंचे वकील आणि ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी पाचव्या दिवशीही युक्तिवाद




केला. ज्या निकालामुळे निवडणूक आयोगाला त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील अधिकार मिळाला त्या निकालाचा फेरविचार करण्यात यावा अशी मागणी त्यांनी केली. कपिल सिब्बल म्हणाले की, ''निवडणूक आयोगाच्या संदर्भात या आधी पाच न्यायालयाच्या घटनापीठीने निर्णय दिला होता. त्याचा पुनर्विचार करण्यासाठी तो सात न्यायाधिशांच्या घटनापीठाकडे पाठवला जावा. या घटनापीठाने निर्णय देताना म्हटले होते की, एकाच वेळी दोन वेगवेगळ्या मुद्द्यावर सुनावणी होऊ शकते. आमदारांच्या अपात्रतेवर विधानसभा अध्यक्ष निर्णय घेऊ शकतात. त्याचवेळी पक्ष आणि चिन्हाची सुनावणी निवडणूक आयोग घेऊ शकते. मात्र विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयात आमदार जर अपात्र ठरले तर त्याच्या आधारे म्हणजे, विधिमंडळ बहुमताच्या आधारे निवडणूक आयोग निर्णय घेणार असेल तर तो निर्णय काय होणार? म्हणजे हे दोन्ही निर्णय एकमेकांवर अवलंबून असताना त्याच्या वेगवेगळया सुनावण्या घेण्यासंबंधी घटनापीठीने निर्णय दिला. त्यामुळे या निर्णयाचा सात न्यायाधीशांच्या ▶▶ पान २ वर

## कुंभमेळ्याच्या कामांशी संबंधित २.१७ कोटींची फसवणूक

### गिरीश महाजन यांच्या नातेवाईकाला अटक



नाशिक । प्रतिनिधी

नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या कामांशी संबंधित फायदेशीर कंत्राटे मिळवून देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीची २.१७ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या दोघांमध्ये मंत्री गिरीश महाजन यांच्या एका नातेवाईकाचा समावेश आहे. अटक करण्यात आलेल्या गोघांची तनय महाजन (३२) आणि नरेंद्र तोताराम महाजन (५१) अशी पटली आहे.

महाजन यांनी कबूल केले की, आरोपी हा त्यांचा दूरचा नातेवाईक असला तरी तो गॉन केस (सुधारण्याची शक्यता नसलेली ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# टाटा : उद्योगाची ताकद मोठी की विश्वासाचे भांडवल?

भारतामध्ये उद्योगपती म्हटले की टाटा, अंबानी आणि अदानी ही तीन मोठी नावे समोर येतात. तिन्ही समूह आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली आहेत; मात्र समाजाच्या नजरेत या तिन्ही नावांची प्रतिमा सारखी नाही. त्यातील सर्वात महत्त्वाचा फरक आहे विश्वासाचा. जमशेदजी टाटा यांनी १८६८ मध्ये सुरू केलेल्या उद्योगप्रवासाने भारतीय औद्योगिकीकरणाला नवी दिशा दिली. पोलाद, वाहन, माहिती-तंत्रज्ञान, विमान वाहतूक, ग्राहक उत्पादने अशा अनेक क्षेत्रांत टाटा समूहाने आपली छाप निर्माण केली. टाटा समूहाची खरी ताकद केवळ त्याच्या कंपन्यांच्या बाजारमूल्यात नाही, तर अनेक दशकांत निर्माण झालेल्या संस्थात्मक विश्वासात आहे.

टाटा सन्समधील ६६ टक्के हिस्सा टाटा ट्रस्ट्सकडे आहे. शिक्षण, आरोग्य, संशोधन आणि सामाजिक विकासासाठी या ट्रस्ट्सकडून होणारे काम टाटा समूहाला इतर कॉर्पोरेट समूहांपेक्षा वेगळी ओळख देते. त्यामुळे 'टाटा' हे केवळ उद्योगाचे नाव राहिलेले नाही; ते एका विशिष्ट व्यावसायिक मूल्यव्यवस्थेचे प्रतीक बनले आहे. पण आज त्या विश्वासाचीच खरी परीक्षा सुरू झाली आहे. गेल्या काही वर्षांत भारतात उद्योग आणि सत्तेतील संबंध हा सार्वजनिक चर्चेचा विषय बनला आहे. अदानी आणि अंबानी समूहांच्या वेगवान विस्तारावर विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जातात. मोठ्या पायाभूत सुविधा, ऊर्जा, विमान वाहतूक, दूरसंचार आणि तंत्रज्ञान क्षेत्रांत सरकार आणि खासगी उद्योगांचे सहकार्य अपरिहार्य आहे. त्यामुळे सरकारशी उद्योगांचे संबंध असणे हे स्वतःमध्ये चुकीचे नाही. मात्र नियम सर्वांसाठी समान आहेत का, स्पर्धेला समान संधी मिळते का आणि उद्योगाची वाढ कार्यक्षमतेवर होते की सत्तेच्या जवळिकीवरहा खरा प्रश्न आहे. कारण उद्योग आणि राजकारणातील जवळीक जर पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करू लागली, तर त्याचा फटका केवळ एका उद्योगसमूहाला बसत नाही. संपूर्ण कॉर्पोरेट व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळतो. याच ठिकाणी टाटा समूहाचे महत्त्व वाढते. टाटा नावाची सार्वजनिक प्रतिमा मोठ्या प्रमाणावर उद्योगाबरोबरच प्रामाणिकपणा, सामाजिक जबाबदारी आणि संस्थात्मक विश्वासाशी जोडली गेली आहे. टाटा मोटर्सपासून टीसीएसपर्यंत आणि टाटा स्टीलपासून टायटनपर्यंत विविध क्षेत्रांतील विस्तार असूनही या समूहाकडे पाहण्याची भारतीय समाजाची नजर केवळ 'किती पैसा कमावला?' अशी राहिलेली नाही. म्हणूनच टाटांसमोरील आव्हान केवळ बाजारातील स्पर्धेचे नाही. टाटा मोठा समूह आहे हे सिद्ध करण्याची गरज त्यांना नाही; टाटा वेगळा का आहे, हे सिद्ध करण्याची गरज आहे. रतन टाटा यांच्या निधनानंतर हा प्रश्न आणखी महत्त्वाचा झाला आहे. त्यांच्या नेतृत्वाने टाटा नावाला जागतिक विस्तारासोबत विश्वासाची मजबूत प्रतिमा दिली. पुढील नेतृत्वाची खरी कसोटी किती कंपन्या विकत घेतल्या, किती गुंतवणूक केली किंवा बाजारमूल्य किती वाढवले यावरच होणार नाही. टाटा नावाशी जोडलेला विश्वास किती टिकवला, यावरही होणार आहे. मात्र या चर्चेकडे 'टाटा विरुद्ध अदानी' किंवा 'टाटा विरुद्ध अंबानी' अशा राजकीय चष्म्यातून पाहणे चुकीचे ठरेल. भारताला मोठे उद्योगसमूह आवश्यक आहेत. देशाला गुंतवणूक, रोजगार, तंत्रज्ञान, जागतिक स्पर्धात्मकता आणि पायाभूत विकासाची गरज आहे. टाटा असो, अदानी असो किंवा अंबानीजो उद्योग पारदर्शकपणे, कायद्याच्या चौकटीत आणि कार्यक्षमतेच्या आधारावर वाढतो, त्याचे स्वागतच झाले पाहिजे. पण त्याचवेळी एक मूलभूत मर्यादा स्पष्ट असली पाहिजेकोणताही उद्योगसमूह सरकारपेक्षा मोठा नसावा आणि सरकारनेही कोणत्याही उद्योगसमूहाला नियमांपेक्षा मोठे बनवू नये. भारताला अब्जावधी डॉलरचे उद्योगसमूह हवेत; पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे भारताला विश्वासार्ह उद्योगसंस्कृती हवी आहे. उद्योगाची ताकद त्याच्या सत्तेशी असलेल्या जवळिकीने नव्हे, तर नवकल्पना, गुणवत्ता, गुंतवणूक, रोजगार आणि पारदर्शकतेने मोजली गेली पाहिजे. टाटा समूहाने भविष्यात सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स, ऊर्जा, संरक्षण, विमान वाहतूक आणि तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रांत मोठी गुंतवणूक केली तरी त्याचे स्वागत झाले पाहिजे. मात्र या विस्तारासोबत टाटा नावाचे सर्वात मोठे भांडवल विश्वास अबाधित राहिले पाहिजे. कारण पैसा पुन्हा कमावता येतो. बाजारमूल्य पुन्हा वाढवता येते. कंपनी पुन्हा उभी करता येते. पण सार्वजनिक विश्वास गमावला तर तो पुन्हा मिळवण्यासाठी वर्षे नव्हे, कदाचित पिढ्या लागतात. म्हणून टाटा समूहासमोरील खरी परीक्षा नफ्याची नाही; विश्वासाची आहे. आज भारताला केवळ मोठे उद्योगपती नको आहेत. भारताला असे मोठे उद्योग हवे आहेत ज्यांच्याकडे पाहताना सामान्य नागरिकाला वाटेलहा उद्योग शक्तिशाली आहे, जागतिक आहे, नफा कमावतो; पण तो देशाच्या संस्था, कायदा आणि लोकशाहीपेक्षा मोठा नाही. याच कसोटीवर टाटांचे भवितव्य ठरणार आहे. टाटा समूहाने इतर उद्योगसमूहांपेक्षा किती मोठे व्हायचे, हा प्रश्न दुय्यम आहे. टाटा नावाने कमावलेला विश्वास पुढच्या पिढीपर्यंत तितक्याच ताकदीने पोहोचणार का, हा खरा प्रश्न आहे.

# चिमुकल्यांच्या जीवाशी खेळाल तर खैर नाही!; धोकादायक स्कूल बसांवर वाहतूक शाखेचा दणका

## तीन दिवसांत कागदपत्रे सादर करण्याचे आदेश; नियमभंग झाल्यास वाहन जप्त करून कठोर कारवाईचा इशारा

बीड । प्रतिनिधी

**शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड करून धोकादायक अवस्थेतील वाहनांमधून विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या शाळा व्यवस्थापन व वाहनचालकांविरोधात बीड जिल्हा वाहतूक शाखेने आता कठोर भूमिका घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीबाबत प्राप्त झालेल्या गंभीर तक्रारींची दखल घेत तक्रारीतील वाहनांची तात्काळ दुरुस्ती करून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होईपर्यंत त्यांचा शालेय वाहतुकीसाठी वापर बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.**




जिल्हा वाहतूक शाखेने १० ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या पत्रातून शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या काही वाहनांची धक्कादायक अवस्था समोर आली आहे. काही वाहनांच्या पाट्या तुटलेल्या, बॉडी वाकलेल्या तर काही वाहने अत्यंत धोकादायक स्थितीत विद्यार्थ्यांची वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेष म्हणजे एमएच २३ डब्ल्यू ०६०७ हे वाहन मूळतः रुग्णवाहिका म्हणून नोंद असतानाही त्याचा स्कूल बस म्हणून वापर केला जात असल्याचे आढळून आले आहे. विद्यार्थ्यांच्या जीविताशी संबंधित हा प्रकार गांभीर्याने घेत वाहतूक शाखेने शाळा व संस्थाचालकांना नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांनी मोटार वाहन कायदा व शालेय बससंदर्भातील नियमांनुसार आवश्यक सुरक्षा मानके पूर्ण करणे बंधनकारक आहे. स्कूल बसला पिवळा हाय-व्हिजिबिलिटी रंग, पुढील व मागील बाजूस 'डउकजजङ इणड' अथवा 'शाळा बस' अशी स्पष्ट अक्षरे, वैध फिटनेस प्रमाणपत्र, विमा, आरसी, पीयूसी, परमिट तसेच चालकाचा वैध परवाना असणे आवश्यक आहे. वाहनामध्ये अग्निशामक यंत्र, प्रथमोपचार पेटी, आपत्कालीन दरवाजा, आपत्कालीन रॉड, स्पीड गव्हर्नर यांसह आवश्यक सुरक्षा व्यवस्था असणे बंधनकारक आहे. वाहनाची बॉडी, टायर, स्टेअरिंग व हेडलाईट्स सुस्थितीत असणे आवश्यक आहे. तसेच स्कूल बस चालकाकडे किमान पाच वर्षांचा वाहन चालविण्याचा अनुभव असावा आणि त्याच्यावर गंभीर वाहतूक गुन्ह्याची नोंद नसावी. विद्यार्थ्यांच्या चढ-उताराच्या वेळी त्यांच्या सुरक्षेसाठी महिला अटेंडंट किंवा मदतनीस असणेही आवश्यक आहे. शाळांमधून विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांची शाळा वाहतूक समितीमार्फत तातडीने तपासणी करून घ्यावी. तसेच आरसी, फिटनेस, विमा, परमिट आणि चालकाच्या परवान्याच्या साक्षांकित प्रती तीन दिवसांच्या आत जिल्हा वाहतूक शाखेकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विशेषतः रुग्णवाहिका म्हणून नोंद असलेली किंवा तुटलेल्या पाट्या व इतर त्रुटी असलेली वाहने दुरुस्ती व कागदपत्रांची पूर्तता होईपर्यंत विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरू नयेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या नियमांना केराची टोपली दाखवून असुरक्षित वाहनातून विद्यार्थ्यांची वाहतूक सुरू ठेवल्याचे आढळल्यास संबंधित वाहन जप्त करण्यासह वाहनमालक, संस्थाचालक व चालकाविरुद्ध मोटार वाहन कायदा तसेच भारतीय न्याय संहितेनुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा वाहतूक शाखेने दिला आहे.

### “ विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत सुरक्षिततेची जबाबदारी शाळेची!- पोलीस निरीक्षक वैभव पाटील

यापूर्वी दि. ४ ऑगस्ट रोजी बंकटस्वामी महाविद्यालय, जालना रोड, बीड येथे जिल्हा वाहतूक शाखा व परिवहन विभागाच्या वतीने शालेय अधिकारी व कर्मचारी, स्कूल बस चालक तसेच रिक्षाचालकांची बैठक घेण्यात आली होती.यावेळी विद्यार्थ्यांची काळजी घेणे, त्यांच्या सुरक्षिततेची खबरदारी घेणे आणि त्यांना घरापर्यंत सुरक्षित पोहोचविणे ही शालेय कर्मचारी व संबंधित वाहनचालकांची जबाबदारी आहे, असे स्पष्ट करण्यात आले होते. तरीदेखील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा अथवा चुकीचा प्रकार यापुढे घडल्यास संबंधितांना कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी दिला आहे.



## प्रणिता कापसे यांनी उपशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा परिषदेच्या अंबाजोगाई गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता कापसे यांनी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गोंदिया येथे पदभार स्वीकारला.**

श्रीमती कापसे यांनी केज, अंबाजोगाई येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण, शाळाभेटी आणि शिक्षकांना मार्गदर्शन आदी उल्लेखनीय कार्य केले. शासनाने शिक्षण विस्तार अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांना पदोन्नती दिली, त्यामध्ये कापसे यांचा समावेश आहे. उपशिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचे स्नेहांकित व मित्रपरिवारांनी अभिनंदन केले आहे.

# बदामराव पंडित, बाळराजे पवारांच्या उपस्थितीत गेवराईत भाजपची भव्य तिरंगा रॅली

## विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रम उत्साह संचारला

गेवराई । प्रतिनिधी

**१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या औचित्य साधून भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजप नेते बाळराजे पवार, भाजप जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्या उपस्थितीत गेवराई शहरात भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थित होते देशभक्तीचा उत्साह संचारला.**



भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी गेवराई शहरात माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक ते शास्त्री चौक अशी भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शहरातील शालेय विद्यार्थ्यांसह नागरिक हातात तिरंगी ध्वज घेऊन सहभागी झाले होते. भारत माता की जय, वंदे मातरम अशा घोषणा देऊन उपस्थितांनी परिसर दणाणून सोडला. शास्त्री चौक येथे झालेल्या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांमध्ये उत्साह निर्माण केला. याप्रसंगी झालेल्या कार्यक्रमास भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजप नेते बाळराजे पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, नगराध्यक्ष गीताताई पवार, नगर उपाध्यक्ष रेवतीताई घुंबार्डे, तिरंगा रॅलीचे संयोजक युवानेते यशराज पंडित, युवा नेते शिवराज पवार, युवा नेते रोहित पंडित, भाजपा तालुका समन्वयक श्रीकांत भाजपा, जि प माजी अध्यक्ष मीराताई गांधले, रॅलीचे जिल्हा संयोजक देविदास नागरगोजे सहसंयोजक गणेश लांडे, सहसंयोजक संध्याताई राजपूत, मंडळ अध्यक्ष सचिन दाभाडे, अॅड उद्धव रासकर, राजेश पवार, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, बांधकाम सभापती राजेंद्र राक्षसभुवनकर, सभापती शेख शेहदाद, सभापती प्रशांत राख, सभापती महेश संदर्भात, नगरपरिषद मुख्याधिकारी विक्रम मांडुरके आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, बाळराजे पवार, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, नगराध्यक्ष गीताताई पवार यांनी हर घर तिरंगा आणि तिरंगा रॅली बद्दल उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तप्रसाद जाधव यांनी केले. या रॅलीमध्ये गेवराई शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या हातातील तिरंगा, देशभक्तीच्या घोषणा आणि त्यांचा उत्साह यामुळे संपूर्ण वातावरण उत्साहाचे झाले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत देशप्रेमाची भावना मनापासून व्यक्त केली. प्रत्येकाच्या मनात तिरंग्याबद्दलचा अभिमान आणि भारतमातेबद्दलची श्रद्धा दिसून आली. या रॅलीला सर्व नगरसेवकांसह गेवराईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि संपूर्ण शहर देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले.

# रात्री तासन् तास झोप येत नाही?-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी



**दिवसभराच्या धावपळीनंतर रात्री अंथरुनावर पडल्यावरही अनेकांना झोप लागत नाही. मोबाईल स्क्रोल करणे, कामाचा ताण, भविष्याची चिंता किंवा सतत सुरु असलेले विचार यामुळे झोपेचा दर्जा खालावतो. आणि अपुऱ्या झोपेमुळे दुसऱ्या दिवसी थकवा चिडचिड जाणवू लागते. अशा परिस्थितीत सोशल मीडियावर आणि आरोग्यावर आणि आरोग्यविषयक चर्चांमध्ये मिलिटरी स्लीप मेथड ही पध्दत मोठ्या प्रमाणात चर्चेच आली आहे. नियमित सराव केल्यास कमी वेळा झोप लागण्यास ही पध्दत मदत करु शकते, अशा दावा केला जातो.**

ही एक रिलेक्सेशन टेकनीक आहे. शरीरातील ताण कमी करुन मन शांत करण्यावर या पध्दतीचा भर असतो. असे मानले जाते की, ही पध्दत अमेरिकन तष्करातील वैमानिकांना कमी वेळेत झोप लागावी आणि कठीण परिस्थितीतही पुरेशी विश्रांती मिळावी यासाठी विकसित करण्यात आली होती. ही पध्दत करुन पाहायची असेल तर आरामदायी स्थितीत झोपा आणि डोळे बंद करा. सर्वप्रथम चेहरा,जबडा आणि डोळ्यांभोवतीचे स्नायू पूर्णपणे सैल सोडा. त्यानंतर खांदे, हात आणि तळहात रिलेक्स करा. खोल श्वास घ्या आणि हळूहळू सोडा. छाती,पोट,पायामधील ताण कमी करा. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

## पान १ वरून...

### महाबीजवर कारवाई

११३ प्रकरणांत प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पाहणीनंतर ७ हजार ८११ बियाण्यांचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी घेण्यात आले. प्रयोगशाळेच्या अहवालात १ हजार ८२ नमुने अप्रमाणित असल्याचे समोर आले. या प्रकरणांमध्ये आतापर्यंत ८५ गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी १८ कंपन्यांविरोधात ७९ गुन्हे, तर इतर कंपन्यांविरोधात ६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. महाबीज ही राज्य सरकारच्या अखत्यारीतील बियाणे कंपनी आहे. कृषी सचिव हे महाबीजच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष असल्याने कंपनीवर सरकारचे थेट नियंत्रण आहे. त्यामुळे खासगी कंपन्यांविरोधात गुन्हे दाखल होत असताना महाबीजविरोधात मात्र कारवाई का झाली नाही, असा प्रश्न शेतकरी आणि विरोधकांकडून उपस्थित होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी या प्रकरणावर बोलताना महाबीजचा स्वतंत्रपणे उल्लेख टाळल्याने संशयाला आणखी बळ मिळत असल्याची चर्चा आहे.

------------

### आरएसएसच्या अभिव्यक्ती

केंद्र सरकार, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावरही टीका केली. जंतरमंतरवरील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा संदर्भ देताना राहुल गांधी म्हणाले की, विद्यार्थ्यांना आपली बाजू मांडायची होती. विद्यार्थी अडचणीत आहेत आणि त्यांना बोलायचे आहे; मात्र सरकार त्यांना बोलू देत नाही. जंतरमंतरवर व्यवस्था कायम ठेवण्याच्या नावाखाली त्यांचा आवाज दाबला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. उत्तराखंडमध्ये चार वर्षांपूर्वी आपल्या मुलीवर बलात्कार करून तिची हत्या झाल्याचा आरोप असलेल्या एका महिलेचा उल्लेखही राहुल गांधी यांनी केला. ''ती महिला रडत आहे, तिची व्यथा मांडू इच्छिते; मात्र यंत्रणा तिला बोलण्याची परवानगी देत नाही,'' असे ते म्हणाले. ''हा देश व्यक्त होण्यापासून थांबणार नाही. भारतातील काही लोक भ्याड असल्यासारखे वागत आहेत. ३००० वर्षे जुना भारत समजून घेण्यापेक्षा आजचा भारत समजून घेणे गरजेचे आहे,'' असेही राहुल गांधी यांनी म्हटले. आरएसएसच्या विचारांशी आपले मतभेद असले तरी त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाकारले जाऊ नये, अशी भूमिका राहुल गांधी यांनी मांडल्याने त्यांच्या विधानाची राजकीय वर्तुळात विविध अंगांनी चर्चा सुरू झाली आहे.

----------

### पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री बादल

गुरुद्वारा परिसर आणि संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली.

सुखबीरसिंह बादल हे आपली पत्नी तथा खासदार हरसिमरत कौर बादल यांच्यासह दर्शनासाठी नांदेडमध्ये दाखल झाले होते. गुरुवारी सकाळी गुरुद्वारा परिसरात दर्शन घेत असताना निहंग पोशाखात आलेल्या एका इसमाने त्यांच्यावर शस्त्राने (तलवारीने) अचानक वार केला. सुरक्षा रक्षक आणि उपस्थितांनी तत्परता दाखवल्याने मोठा अनर्थ टळला; मात्र यात बादल यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली. घटनेची माहिती मिळताच नांदेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. हल्ला करणाऱ्या संशयित आरोपीला पोलिसांनी तत्काळ ताब्यात घेतले आहे. हल्ल्याचे नेमके कारण काय? आरोपीचा बादल यांच्याशी काही जुना विवाद होता का? अथवा यामागे काही राजकीय/धार्मिक षडयंत्र आहे का, याचा कसून तपास पोलिस करत आहेत. घटनेच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून सचखंड गुरुद्वारा परिसर आणि यशोसाई हॉस्पिटलच्या बाहेर कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. नागरिकांनी आणि भाविकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यशोसाई हॉस्पिटलमध्ये सुखबीरसिंह बादल यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बादल यांच्यावरील हल्ल्यासंदर्भात पोलीस अधीक्षकांकडून माहिती घेतली आहे. याशिवाय फडणवीस यांनी बादल यांच्यासोबत फोनवर चर्चा केली असल्याची माहिती आहे. सुखबीर सिंग बादल यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी माहिती दिली.

-----------

### महाराष्ट्रातील दहा कलावंतांचा

दिग्दर्शनासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की आणि कथ्थक नृत्यासाठी मनीषा साठे यांना हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. दरम्यान, सन १९५२ पासून प्रदान करण्यात येणारे संगीत नाटक अकादमी पुरस्कार हे भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय सन्मानांपैकी एक आहेत. कलाक्षेत्रातील प्रदीर्घ, उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण योगदानाची दखल घेत कलाकारांना या पुरस्काराने गौरविण्यात येते.

------------

### कुंभमेळ्याच्या कामांशी संबंधित

व्यक्ती) आहे आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जावी, अशी मागणी त्यांनी केली. कुंभमेळ्यासाठीच्या बनावट वर्क ऑर्डर्सशी संबंधित ३०५ कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी ही अटक केली. कुंभमेळ्याच्या कामासाठी हाऊसकीपिंगचे कंत्राट मिळवून देण्याच्या बहाण्याने त्यांनी एका व्यक्तीची २.१७ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. आरोपी आणि त्यांच्या साथीदाराने तक्रारदाराचा विश्वास संपादन करण्यासाठी त्याला एक बनावट वर्क ऑर्डर दाखवली होत३ी. या कागदपत्रावर भारत सरकारचे बोधचिन्ह आणि नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणचे नाव होते. तनय हा त्यांचा दूरचा नातेवाईक आहे आणि त्याच्याविरुद्ध यापूर्वीही गुन्हे दाखल झाले आहेत, असे महाजन यांनी कबूल केले. मी नाशिकचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्याशी बोललो आणि या गुन्ह्यात तीन-चार नावे समोर आली होती. मला वाटते की यात सहा ते सात जण सामील होते आणि त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, असे महाजन म्हणाले.

------------

### चंद्रचूड यांच्या घटनापीठाने दिलेल्या

घटनापीठाने पुनर्विचार करावा.'' शिंदेंच्या गटाकडे आमदारांची संख्या मोठी असल्याने त्या आधारे निवडणूक आयोगाने निर्णय दिला. पक्षाचे चिन्ह कोणाला द्यायचे हे ठरवण्यासाठी विधिमंडळ शाखेतील बहुमत निर्णायक ठरते, असा आयोगाचा निष्कर्ष येतो. पण संविधानात तशी कोणतीही तरतूद नाही. निवडणूक आयोगाच्या गृहितकाला कोणताही आधार नाही. शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर एकनाथ शिंदे यांच्याकडे विधानसभेतील ५५ पैकी ४० आमदार होते. तर ठाकरेंकडे १५ आमदार होते. विधान परिषदेमधील १२ आमदारांपैकी एकही आमदार शिंदेंकडे नव्हता, सर्व आमदार हे ठाकरेंच्या सोबत होते. लोकसभेतील १९ पैकी १३ खासदार शिंदेंसोबत गेले, तर ठाकरेंकडे सहा खासदार होते. राज्यसभेमध्ये शिंदेंसोबत कुणीही गेले नाही, तर ठाकरेंकडे तीन खासदार होते. या सगळ्या आकडेवारीनुसार, ठाकरेंकडे ३४ आमदार आणि खासदार होते. तर शिंदेंकडे ती संख्या ५३ इतकी होती. परंतु त्यापैकी ३९ आमदार हे अपात्रतेच्या कारवाईला सामोरे जात होते. त्या सगळ्यांना जर विधानसभा अध्यक्षांनी अपात्र ठरवले असते तर विधिमंडळातील बहुमत हे ठाकरेंकडे असते, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.

-----------

### जरांगे यांची टिका

ते म्हणाले, ''माझे व्यंग काढून किंवा माझ्यावर टीका करून जर त्यांना आनंद मिळत असेल, तर खुशाल मिळू द्या, मी त्यावर काहीही बोलणार नाही. पण माझ्या घरातही माझी पत्नी, नातू, वडील, मुले आणि बहीण असा परिवार आहे. या गोष्टींचा त्यांनाही खूप त्रास होतो. माझ्यावर टीका केल्याने जर न्याय मिळणार असेल, तर त्यांनी माझी खुशाल टिंगल करावी,'' असं बोलताना बावनकुळे यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते. तर, आपला कोणत्याही जातीवादाशी संबंध नसल्याचे बावनकुळे म्हणाले आहेत. ''माझी पत्नी कुणबी समाजाची आहे, तर माझी सूनबाई मराठा आहे. आम्ही सर्वजण एकाच घरात गुण्यागोविंदाने राहतो. आम्ही कधीही कुणबी, तेली किंवा मराठा असा कोणताही वाद करत नाही,'' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ''मी कधीच जातीपातीचे राजकारण करत नाही. महसूल विभागाने आतापर्यंत तब्बल २२ लाख कुणबी जात प्रमाणपत्रे दिली आहेत. यापैकी एखाद्या प्रमाणपत्रात त्रुटी असल्याच्या संशयावरून चौकशी लावली होती आणि ती देखील आता पूर्ण झाली आहे. जात पडताळणी अहवाल देण्याचे काम माझ्या महसूल विभागाचे नसून ते समाजकल्याण विभागाचे आहे, त्यामुळे या एका प्रमाणपत्रामुळे जरांगे पाटील यांचा मोठा गैरसमज झाला आहे,'' असा खुलासा बावनकुळे यांनी केला.

------------

## थोडक्यात

### 'विकसित भारत' स्वप्न साकारण्यासाठी महासांगवी ग्रामपंचायतीचा केंद्र सरकारकडे विशेष निधीचा आग्रह

पाटोदा । प्रतिनिधी

'विकसित भारत २०४७' या संकल्पनेला बळकट करण्यासाठी आणि गावांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी केंद्र सरकारने ग्रामपंचायतींना थेट विशेष निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी महासांगवी (ता. पाटोदा, जि. बीड) ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. चैताली नामदेव सानप यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे.

देशाचा विकास हा खऱ्या अर्थाने खेड्यांच्या विकासावर अवलंबून असतो, हे अधोरेखित करत सरपंच सौ. सानप यांनी पत्रात म्हटले आहे की, जोपर्यंत गावागावांत मूलभूत सोयीसुविधा पोहोचत नाहीत, तोपर्यंत देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. यासाठी त्यांनी प्रत्येक ग्रामपंचायतीला किमान २ कोटी रुपयांचा विशेष निधी थेट उपलब्ध करून देण्याची आग्रही मागणी केली आहे.

मागणी केलेल्या मुख्य सुविधा:

रस्ते: गावांतर्गत दर्जेदार अंतर्गत रस्त्यांचे जाळे निर्माण करणे, प्रकाश व्यवस्था: प्रत्येक गल्लीत एलईडी पथदिव्यांची सोय करणे, आरोग्य व स्वच्छता: सांडपाणी व्यवस्थापन आणि परिसर स्वच्छता राखणे, पर्यावरण व सुशोभिकरण: रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करणे, तसेच सुसज्ज बगीचा आणि स्मशानभूमीचा विकास करणे,

प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणीचा प्रस्ताव:

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, सरपंच सौ. सानप यांनी एक नाविन्यपूर्ण प्रस्ताव मांडला आहे. पहिल्या टप्प्यात बीड जिल्ह्यातील महासांगवी ग्रामपंचायतीसह राज्यातील निवडक १०० ग्रामपंचायतींमध्ये प्रायोगिक तत्वावर ही योजना राबवावी. या उपक्रमातून मिळणारे सकारात्मक निष्कर्ष पाहून संपूर्ण राज्य आणि देशात ही योजना लागू करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. या महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी आणि मार्गदर्शनासाठी आपण १०-१५ मिनिटांचा वेळ द्यावा, अशी विनंतीही सरपंच सौ. सानप यांनी केंद्रीय गृहमंत्री शाह यांच्याकडे केली आहे. या मागणीमुळे ग्रामीण विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### पीकविमा आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - बालासाहेब येवले

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात खरीप २०२५ मध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली होती या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील खरीपाची सर्वच पिके उध्वस्त झाली होती. त्यावेळी महाराष्ट्राचे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन अतिवृष्टीच्या मदतीची व पीकविमा प्रति हेक्टर १७५००/ रुपये देऊ म्हणून घोषणा केली होती व तसा जीआर पण काढला होता. पण आज एक वर्ष झाले तरी अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसान भरपाई मिळालेली नाही तसेच प्रतिहेक्टर १७५००/ रुपये पिक विमा देखील मिळालेला नाही. मा.मुख्यमंत्र्यांना त्यांच्या घोषणेची आठवण करून देण्यासाठी व अल नीनोच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी घोषित केल्या प्रमाणे तात्काळ पिक विमा मिळावा म्हणून जिल्ह्यातील अनेक शेतकरी संघटना आंदोलन करीत आहेत.

अशातच मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेला १७५००/ रुपये प्रति हेक्टर पिक विमा तात्काळ मिळावा, बंद केलेले ट्रिगर व एक रुपयात पिक विमा पूर्ववत चालू करावा, रखडलेले अतिवृष्टी अनुदान तात्काळ वाटप करावे, नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ द्यावा या आणि अशा शेतकरी हिताच्या विविध मागण्या घेऊन जागर प्रतिष्ठानचे विशाल जाधव हे १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्य दिनापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव येथील महाराजांच्या स्मारकासमोर आमरण उपोषण करणार आहेत. या आंदोलनात माजलगाव तालुक्यातील व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन शेती प्रश्नांचे अभ्यासक प्रा.बालासाहेब येवले यांनी केली आहे.

# बिबट्यानंतर आष्टीत वाघाची एन्ट्री?

## पाऊलखुणा अन्? जनावराच्या शिकारीने खळबळ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याच्या दहशतीने नागरिक त्रस्त असतानाच आता वाघाच्या हालचालींची शक्यता निर्माण झाल्याने ग्रामीण भागात खळबळ उडाली आहे. देवळालीवेलतुरी परिसरात वनविभागाच्या कर्मचाऱ्यांना पेट्रोलिंगदरम्यान मोठ्या वन्यप्राण्याच्या पाऊलखुणा आढळून आल्याची माहिती आहे. त्याच परिसरात देवळाली येथील एका शेतकऱ्याच्या मोठ्या पाळीव जनावराची शिकार झाल्याचेही समोर आले आहे.

पाऊलखुणा आणि जनावराच्या शिकारीच्या घटनेमुळे आष्टीच्या शिवारात नेमका कोणता वन्यप्राणी वावरत आहे, याबाबत नागरिकांमध्ये प्रचंड उत्सुकता आणि भीती निर्माण झाली आहे. वनविभागाकडून या पाऊलखुणांची पाहणी करण्यात आली असून, त्या वाघाच्या असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, वनविभागाकडून अधिकृतपणे प्राण्याची ओळख निश्चित होणे महत्त्वाचे आहे.

बिबट्याच्या दहशतीत आता वाघाची भर?

आष्टी तालुक्यातील अनेक भागांत बिबट्याच्या हालचाली यापूर्वीही निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे शेतकरी आणि ग्रामस्थ आधीच सावध असताना आता वाघाच्या पाऊलखुणा




देवळाली-वेलतुरी परिसरात पाऊलखुणा आढळल्याची वनविभागाची माहिती; मोठ्या जनावराची शिकार झाल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

आढळल्याच्या माहितीने चिंतेत भर पडली आहे. बिबट्याच्या दहशतीतून सावरत असतानाच वाघाचा संभाव्य वावर समोर आल्याने शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, देवळाली परिसरात मोठ्या जनावरावर हल्ला होऊन त्याची शिकार करण्यात आली आहे. त्यामुळे पाऊलखुणा आणि शिकार या दोन्ही घटनांचा परस्पर संबंध आहे का, याचा वनविभागाने सखोल तपास करणे गरजेचे आहे.

**ट्रॅप कॅमेरे बसविण्याची मागणी**

ज्या ठिकाणी पाऊलखुणा आढळल्या आहेत, त्या परिसरात तातडीने ट्रॅप कॅमेरे बसवून वन्यप्राण्याच्या हालचालींवर नजर ठेवावी, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे. तसेच पाऊलखुणांचे शास्त्रीय पद्धतीने परीक्षण करून संबंधित वन्यप्राण्याची निश्चित ओळख करावी, अशीही मागणी आहे.

नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

वनविभागाकडून नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी एकट्याने शेतात जाणे टाळावे, शेतशिवारात जाताना खबरदारी घ्यावी आणि कोणत्याही वन्यप्राण्याच्या हालचाली दिसल्यास स्वतः त्याचा पाठलाग न करता तातडीने वनविभागाला माहिती द्यावी.

पाऊलखुणा नेमक्या वाघाच्या आहेत का? परिसरात वाघाचा प्रत्यक्ष वावर आहे का? याचा उलगडा ट्रॅप कॅमेरे आणि वनविभागाच्या पुढील तपासातून होणार आहे. मात्र, सध्या तरी बिबट्यानंतर वाघाच्या संभाव्य एन्ट्रीमुळे आष्टी तालुक्यातील शिवारात भीतीचे सावट निर्माण झाले आहे.

# माजी पोलीस आयुक्त व विशेष पोलीस महानिरीक्षक अंकुश शिंदे यांची महाराष्ट्र राज्य सदस्यपदी निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाचे पुनरावलोकन करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या कार्यगटांच्या रचनेत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. यासंदर्भात १० ऑगस्ट २०२६ रोजी कार्यालयीन आदेश जारी करण्यात आला आहे.महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन -मित्र अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या कार्यगट क्रमांक ४ आणि कार्यगट क्रमांक ५ यांच्या रचनेत बदल करण्यात आला आहे.

कार्यगट क्रमांक ४ मध्ये चंद्रकांत दळवी यांची प्रमुखपदी



नियुक्ती झाली आहे

गट-क व अराजपत्रित गट-ब पदांच्या स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाच्या पुनरावलोकनासाठी असलेल्या कार्यगट क्रमांक ४ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. डॉ. प्रमोद शिंदे आणि श्री. दिनेश दळवी यांच्या जागी पुणे विभागाचे माजी विभागीय आयुक्त चंद्रकांत दळवी यांचा प्रमुख म्हणून समावेश

### एमपीएससीच्या अभ्यासक्रम पुनरावलोकनासाठी कार्यगटांच्या रचनेत सुधारणा

करण्यात आला आहे.

या कार्यगटात मित्रचे संचालक विवेक दहिफळे आणि मिलिंद कुलकर्णी यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय या कार्यगटाची व्याप्ती केवळ 'गट-क पदे' इतकी मर्यादित न ठेवता 'गट-क व अराजपत्रित गट-ब पदे' अशी विस्तारित करण्यात आली आहे.

कार्यगट क्रमांक पाच मध्ये अंकुश शिंदे यांचा समावेश

पोलीस, नियामक व प्रादेशिक परिवहन सेवांशी संबंधित स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रम पुनरावलोकनासाठी गठीत करण्यात आलेल्या कार्यगट क्रमांक पाच मध्ये माजी पोलीस आयुक्त व विशेष पोलीस महानिरीक्षक अंकुश शिंदे यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. एमपीएससीच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमाचा सखोल आढावा घेऊन तो अधिक अद्ययावत, उपयुक्त आणि पदांच्या स्वरूपाशी सुसंगत करण्याच्या दृष्टीने या कार्यगटांकडून काम केले जाणार आहे. शासनाच्या आदेशातील इतर सर्व अटी व शर्ती या दोन्ही कार्यगटांना लागू राहणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## पान ६ वरुन...

### बसमध्ये चोरी करणाऱ्या

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, शोभा संजय भालेराव (रा. रमाई चौक, खंडेश्वरी पेठ, बीड) हिने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तिला राहत्या घरातून ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, तिने चोरीची कबुली दिली. तिच्याकडून १,५०,००० रुपये किमतीची चोरीस गेलेली एक तोळा वजनाची सोन्याची पोत (मण्यासह) जप्त करण्यात आली असून पुढील तपास नेकनूर पोलीस करत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, पो.ह. महेश जोगदंड, बप्पासाहेब घोडके, दिलीप गिते, म.पो.ह. स्वाती मुंडे व चा.पो.ह. गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे.

### पतीने पेट्रोल ओतून पत्नीला

आरोप आहे. या घटनेवेळी त्यांचा मुलगा घटनास्थळी उपस्थित होता. आईला वाचवण्यासाठी मुलाने वडिलांकडे विनवणी केली. मात्र, तरीही आरोपीने अनुष्का यांना पेटवून दिल्याचे त्यांनी मृत्यूपूर्वी दिलेल्या जबाबात सांगितले.

'मुलगा पप्पा, मम्मीला मारू नका म्हणून रडत होता...'

या घटनेत अनुष्का शिरसाट गंभीररीत्या भाजल्या. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, ८ ऑगस्ट रोजी पोलिसांनी अनुष्का यांचा जबाब नोंदवला होता. या जबाबात त्यांनी पतीकडून होत असलेल्या छळाची माहिती पोलिसांना दिली. 'तो मला आणि मुलाला बेदम मारायचा. ७ ऑगस्टला पेट्रोल ओतताना मुलगा पप्पा मम्मीला मारू नका म्हणून रडत विनवणी करत होता, तरीही त्याने मला पेटवून दिलं.. साहेब, त्याला जन्मठेप द्या,' अशी मागणी अनुष्का यांनी मृत्यूपूर्वी पोलिसांकडे केली होती. अनुष्का यांच्या या जबाबामुळे या प्रकरणाला गंभीर वळण मिळाले आहे.

घटनेनंतर आरोपी फरार, पोलिसांनी बीडमधून केली अटक

अनुष्का या अंगणवाडी कार्यकर्त्या म्हणून काम करत होत्या. त्यांना मिळणारा पगारही पती स्वतःच्या बँक खात्यावर घेत असल्याची माहिती समोर आली आहे. कौटुंबिक वाद आणि चारित्र्याच्या संशयातून हा प्रकार घडल्याचे प्राथमिक माहितीवरून समोर येत आहे. मात्र, या प्रकरणातील नेमकी कारणे आणि घटनाक्रमाचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. दरम्यान, पत्नीला पेटवल्यानंतर आरोपी मिलिंद शिरसाट घटनास्थळावरून फरार झाला होता. पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी त्याला बीडमधून ताब्यात घेत अटक केली.

### पालवन-देवराई सिमेंट काँक्रीट

हालचालींना वेग आला आणि अखेर पालवन चौकपालवनदेवराई रस्त्याच्या रखडलेल्या कामास सुरुवात झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, जनतेच्या प्रश्नासाठी केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, ''केवळ काम सुरू झाले म्हणून प्रकरण संपलेले नाही. संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई होईपर्यंत आणि देण्यात आलेली मुदतवाढ रद्द होईपर्यंत या प्रकरणात कोणालाही सुट्टी नाही. रस्त्याचे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण झाले पाहिजे,'' असा इशारा वंचित बहुजन आघाडीचे मा. जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी दिला आहे.

**कार्यकारी अभियंता तोंडे यांच्या कार्यकाळातील कामांची माहिती लवकरच समोर आणणार!**

कार्यकारी अभियंता तोंडे यांच्या कार्यकाळात सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ मध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता म्हणून त्यांची होती; मात्र त्यांनी अनेक प्रकरणांमध्ये डोळेझाक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याबाबत त्यांची वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार करण्यात आली असून, त्यांच्या कार्यकाळात किती कामांना मुदतवाढ देण्यात आली, किती कामांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आणि कोणत्या कामांमध्ये नियमबाह्य सवलती देण्यात आल्या, याची माहिती माहितीच्या अधिकारातून मागविण्यात आली आहे. लवकरच ही माहिती उपलब्ध झाल्यानंतर संबंधित कामांतील अनियमितता आणि जबाबदार अधिकाऱ्यांची भूमिका पुराव्यासह जनतेसमोर मांडण्यात येणार आहे.

### भाजप नेते चंद्रकांत फड यांनी

आकर्षण म्हणजे ही झाडे 'बोन्साय' प्रजातीची आहेत. एका छोट्या कुंडीत वाढवलेले पूर्ण, परिपक्व झाड. जपानमध्ये विकसित या प्रजातीमध्ये मोठ्या झाडाला विशिष्ट पद्धतीने लहान ठेवून त्याला नैसर्गिक, देखणा आकार दिला जातो. हे झाड मुळात मोठेच असते, परंतु मुळं छाटून आणि लहान कुंडीत लावून त्याची वाढ मर्यादित केली जाते. फांद्या छाटून आणि तारेने वाकवून त्याला हवा तसा आकार दिला जातो. हे कोणतेही वेगळ्या प्रजातीचे बुटके झाड नसते, तर वड, पिंपळ यांसारख्या सामान्य झाडांनाच काळजीपूर्वक ३० सेमी ते १ मीटर पर्यंत लहान ठेवले जाते. योग्य काळजी घेतल्यास ही झाडे ५० वर्षांहून अधिक काळ जगू शकतात, हे वैशिष्ट्य आहे.

## आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर घळाटवाडी प्रकरणी चौकशी समिती गठित, १५ व्या वित्त आयोगासह घरकुल योजनांची होणार चौकशी

माजलगाव । प्रतिनिधी

घळाटवाडी ग्रामपंचायतीतील १५ वा वित्त आयोग, विविध घरकुल योजना तसेच इतर विकासकामांमध्ये झालेल्या कथित भ्रष्टाचाराची चौकशी करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन सेनेचे मराठवाडा समन्वयक विजयदादा साळवे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १३ ऑगस्ट रोजी पंचायत समिती माजलगावसमोर आमरण उपोषण सुरू केले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंचायत समिती प्रशासनाने त्यांच्या तक्रारीची दखल घेत संबंधित प्रकरणाच्या चौकशीसाठी पाच सदस्यीय समिती गठित केली आहे.

घळाटवाडी ग्रामपंचायतीमध्ये १५ वा वित्त आयोग, विविध घरकुल योजना आणि इतर विकासकामांच्या निधीत अनियमितता व गैरप्रकार झाल्याचा आरोप करीत विजयदादा साळवे यांनी सखोल चौकशीची मागणी केली होती. या प्रकरणी संबंधित दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली होती. मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी रिपब्लिकन सेनेच्या वतीने वाशिष्ठ लांडगे वैजनाथ गडसिंग गंगाधर सोनपसारे सय्यद अन्वर विशाल ससाणे मोकिंदा खरात यांच्या सह कार्यकर्त्यांनी दिनांक १३ रोजी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषणाचे हत्यार उपसले. दरम्यान, तक्रारीची दखल घेत पंचायत समिती माजलगावच्या ग्रामपंचायत विभागाने चौकशी समिती गठित केली आहे. या समितीत श्री. शिंदे एस.यू. (विस्तार अधिकारी पंचायत), श्री. भोसले डी.सी. (शाखा अभियंता/ उपअभियंता, जि.प. उपविभाग माजलगाव), श्री. शिंदे बी.एस. (शाखा अभियंता, जि.प. उपविभाग माजलगाव), श्री. पवार आर.आर. (स्थापत्य अभियंता) आणि श्री. डोंगळे डी.पी. (ग्रामीण अभियंता, ) यांचा समावेश करण्यात आला आहे. चौकशी समितीने घळाटवाडी ग्रामपंचायतीतील संबंधित कामांची कागदपत्रे, मंजूर अंदाजपत्रके, प्रत्यक्ष झालेली कामे, खर्चाच्या नोंदी तसेच विविध योजनांच्या अंमलबजावणीची तपासणी करावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. चौकशी पूर्ण करून १५ दिवसांच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश समितीला देण्यात आले आहेत. चौकशीच्या कामात कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. प्रशासनाच्या या निर्णयामुळे घळाटवाडी ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहाराच्या चौकशीला आता अधिकृत सुरुवात झाली आहे. मात्र, चौकशी समितीचा अहवाल काय निष्पन्न करतो आणि त्यानंतर संबंधितांवर कोणती कारवाई होते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाची तत्परता

विजयदादा साळवे यांनी केलेल्या तक्रारीवर प्रशासनाने चौकशी समिती गठित केल्याने त्यांच्या आंदोलनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. १५ व्या वित्त आयोगासह घरकुल योजनांमध्ये प्रत्यक्षात किती निधी खर्च झाला, कोणती कामे झाली आणि त्यामध्ये नियमांचे पालन झाले का, याचा तपास चौकशीत होणार आहे. त्यामुळे समितीचा अहवाल या संपूर्ण प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट करणारा ठरणार आहे.

## गुंठेवारी प्रमाणपत्राच्या संशयावरून माजलगावात खळबळ चौकशीसाठी राकेश साळवेंचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

नगरपरिषदेकडून देण्यात आलेल्या कथित गुंठेवारी प्रमाणपत्राच्या अनुषंगाने उपलब्ध कागदपत्रे, नोंदी व प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबत संशय व्यक्त करत तालुकाध्यक्ष राकेश साळवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर चौकशीची मागणी केली आहे. याप्रकरणी शिवहर शेटे यांच्याविरोधात तसेच संबंधित कागदपत्रांच्या प्रक्रियेबाबत निवेदन देण्यात आले आहे.



निवेदनात गुंठेवारी प्रमाणपत्राची निर्मिती नेमकी कोणत्या प्रक्रियेतून झाली, ते कोणत्या अर्जाच्या आधारे तयार करण्यात आले, संबंधित अर्जाची आवक कोणत्या क्रमांकाने झाली, कोणत्या फाईलवर त्यावर कार्यवाही झाली आणि प्रमाणपत्र जारी करण्यापूर्वी कोणत्या अधिकाऱ्याने मंजुरी दिली, याची सखोल पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संशयित गुंठेवारी प्रमाणपत्राची फॉरेन्सिक तपासणी करण्यात यावी, संबंधित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांची तज्ज्ञांकडून पडताळणी करावी तसेच प्रमाणपत्रावरील दिनांकांची अधिकृत अभिलेखांशी तुलना करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. याशिवाय संबंधित लाभार्थी, कर्मचारी व अधिकाऱ्यांची नेमकी भूमिका तपासून दोष आढळल्यास कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

गुन्ह्याचा घटक आढळल्यास लागू कायद्यानुसार फौजदारी कारवाई, तर संबंधित अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांकडून नियमभंग झाल्यास सेवाविषयक व विभागीय चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच नगरपरिषद अथवा शासनाचे आर्थिक नुकसान झाले असल्यास त्याची निश्चिती करून कायद्यानुसार नुकसानभरपाई वसूल करावी, अशीही मागणी आहे. या प्रकरणात चौकशी पूर्ण होईपर्यंत नगरपरिषदेच्या मूळ अभिलेखांमध्ये कोणताही फेरफार होऊ नये, संबंधित कागदपत्रे सुरक्षित ठेवावीत आणि आवश्यक असल्यास मूळ दस्तऐवज जप्त करून तपासणी करावी, असेही निवेदनात नमूद आहे. दरम्यान, राकेश साळवे यांनी यापूर्वी विविध मागण्यांसाठी नगरपरिषदेसमोर उपोषण सुरू केले होते. त्यावर नगरपरिषद प्रशासनाने उपस्थित मुद्यांची चौकशी करून कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले असून, मागितलेली माहिती उपलब्ध करून देण्यासाठी दहा दिवसांची मुदत देण्यात आल्याचे कागदपत्रांतून दिसून येते. त्यामुळे आता या गुंठेवारी प्रमाणपत्र प्रकरणातील चौकशीकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# अंबाजोगाई नगरपरिषदेतील नेत्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा समाजाचा द्वेष का?

**'जयवंती नदी, पुरातन विहीर, श्वान घोटाळा, मराठा भवन' १४ ऑगस्टपासून आमरण उपोषण, मागण्या मान्य न झाल्यास काँग्रेस तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांचा आत्मदहनाचा इशारा**

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई नगरपरिषदेतील सत्ताधारी नेते आणि अधिकारी छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठा समाजाबद्दल जाणीवपूर्वक द्वेष करत आहेत का? असा संतप्त सवाल करत काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी नगरपरिषदेच्या भ्रष्ट आणि दुटप्पी कारभारावर तीव्र हल्ला चढवला आहे.नगरपरिषदेने दिलेल्या आंदोलनाची कोणतीही दखल न घेता केवळ थातूरमातूर पत्र देऊन वेळकाढूपणा केला आहे. त्यामुळे दि. १४ ऑगस्ट २०२६ पासून आमरण उपोषण करण्याचा आणि मागण्या मान्य न झाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. आमच्या अस्मितेचा अंबाजोगाई येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक पडला आहे. एकीकडे कोट्यावधीचा विकास कामासाठी निधी आला असताना छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे नगरपरिषद प्रशासन डोळे झाक करत असून येथील अतिक्रमण काढत ''इतिहास प्रेरक चौक'' म्हणून विकास करावा. शहरात महापुरुषांचे पुतळे नको म्हणून घेतलेला ठराव तात्काळ रद्द करून सर्व महापुरुषांचे पुतळे उभारण्याचा ठराव अंबाजोगाई नगरपरिषद सभागृहात घ्यावा.

यशवंतराव चव्हाण चौकाजवळील शासकीय जागेत मराठा समाजाच्या मुलींसाठी वस्तीगृह व मराठा भवन द्यावे. नगरसेविका सौ. श्रुती लोमटे व ॲड. काकडे यांनी २ वेळा पत्र देऊनही हा विषय विषय तालिकेत घेतला नाही त्यानंतर त्यांनी स्मरण पत्र हे दिले तरीही जाणीवपूर्वक हा विषय नगर परिषद सभागृहात येऊ दिला नाही ज्यावेळी लोमटे यांनी सभागृहात विषय मांडला त्यावेळेस लोकविकास आघाडीच्या बहुमतामुळे हा सर्वे नं. १७ मध्ये जागा देण्याचा तोंडी ठराव घेतला मात्र दुसऱ्या मीटिंगमध्ये तो जाणीवपूर्वक ठराव मंजूर झाला म्हणून वाचण्यात आले नाही हा डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रकार आहे. त्यामुळे मराठा भवन व मुलींच्या वस्तीगृहासाठी तात्काळ शहरातील यशवंतराव चव्हाण चौक नजीक जागा द्यावी.



पुरातत्व विभाग आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतरही नगराध्यक्षांनी विहिरीवरील अतिक्रमण काढले नाही. आर्थिक व्यवहार करून ऐतिहासिक विहीर बुजवणाऱ्या तात्कालीन मुख्याधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा. करार संपला असतानाही परत करार देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी. त्याचबरोबर येथील अतिक्रमण तात्काळ निष्काशीत करावे. २९ एप्रिल २०२५ रोजी केलेल्या आमरण उपोषणानंतर १ मे २०२५ रोजी सहाय्यक आयुक्तांनी दिलेल्या आदेशाची अद्याप अंमलबजावणी नाही. स्थापन केलेली समिती जयवंती नदी पात्रात उतरलीच नाही. नदीपात्रातील व पात्रालगत असलेल्या १५ १५ मीटर मधील सर्व बांधकामे तात्काळ थांबवून अतिक्रमण काढावे. सदरील अहवाल तात्काळ देण्यात यावा. अंबाजोगाई शहरातील डम्पिंग ग्राउंड वर पडलेला मृत श्वानाचा खच हा अतिशय दुर्दैवी असून संशयास्पद श्वानाचा मृत्यू झाल्याचे दिसते.श्वान नसबंदी घोटाळा हा अतिशय गंभीर मुद्दा आहे. चौकशी समितीचे प्रमुख उपजिल्हाधिकारी वजाळे साहेब यांची नगरपरिषदेने दिशाभूल केली आहे. सदरील संस्थेवर ठाणे येथे मे महिन्यात गुन्हा दाखल असून ज्यावेळी हे टेंडर त्या संस्थेत गेल्या गेले त्यावेळेस पूर्ण कागदपत्राची चौकशी नगर परिषदेच्या वतीने केली गेली का व बेकायदेशीर रित्या या संस्थेस कुठलीही परवानगी नसताना जे टेंडर यांनी दिले त्या मुख्याधिकारींवर तात्काळ कारवाई करावी त्याचबरोबर जेवढी बिले काढली तेवढ्या श्वानांची नसबंदी झाली का? लॉक बुक, , नोंदी कुठे आहेत? या मागे मोठे रॅकेट आहे. चौकशी करा. नगरपरिषद सभागृहात गाळ्यांचा लिलाव करण्याचा ठराव झाला पण अंमलबजावणी नाही. नियमबाह्यरित्या मोठ्या रकमा घेऊन भाड्याने दिलेल्यांवर कारवाई करा. नगरसेवकांना लिलावातून बाहेर ठेवून सर्वसामान्यांना संधी द्या. ज्या लोकांनी नगरपरिषदेच्या जागा स्वतःच्या नावावर केल्या आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल करून त्या जागा तात्काळ परत घ्याव्यात. अशा मागण्या काँग्रेस तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी केल्या आहे नगरपरिषद प्रशासन एका मागणीला हात लावून इतर मागण्यांकडे डोळेझाक करत आहे. आम्ही जयवंती नदी आणि पुरातन विहिरीला स्वातंत्र्य मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. म्हणून दि. १४ ऑगस्ट २०२६ पासून नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू होईल. प्रशासनाने दखल न घेतल्यास आम्ही आत्मदहन करू असा इशारा काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी दिली आहे. ''मा. महोदय, आम्ही शांततेच्या मार्गाने अनेकदा निवेदन दिली. मात्र प्रशासनाने गांभीर्याने घेतले नाही. आता पाणी नाकापर्यंत आले आहे. आमच्या अस्मिता, नदी आणि वारशासाठी आम्ही जीवाची बाजी लावायला तयार आहोत. तरीही वेळीच जागे व्हा आणि ठोस कारवाई करा, अन्यथा १४ ऑगस्टपासून होणाऱ्या कोणत्याही घटनेला प्रशासन जबाबदार राहील.''

-अभिजीत लोमटे तालुकाध्यक्ष काँग्रेस कमिटी अंबाजोगाई

# सातबाऱ्यावर नाव नसलेल्या शेतकऱ्यांनाही मिळणार फार्मर आयडी

## अन् कर्जमाफीचा लाभ ;महसूल विभागाचा निर्णय

ऑनलाइन लोकमत
पुणे / प्रतिनिधी

राज्यातील ज्या शेतकऱ्यांची नावे सातबारा उताऱ्यावर नाहीत किंवा इतर अधिकारात ज्यांच्या नावांची नोंद नाही, अशा सर्व शेतकऱ्यांना रेकॉर्डवर आणण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यातील तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचा ॲग्रीस्टॅक मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असून, त्यांना कर्जमाफी आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळणे सुलभ होणार आहे.

यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी १५ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिले. राज्यामध्ये सध्या तब्बल २ लाख ३१ हजार शेतकऱ्यांचे ॲग्रीस्टॅक निघत नसल्याची गंभीर बाब समोर आली होती. यामध्ये अनेक तांत्रिक अडचणी होत्या. तसेच सुमारे ५० हजार शेतकरी मयत आहेत, ज्यांच्या नोंदी अद्ययावत नाहीत. १० हजार प्रकरणांमध्ये जमीन वडिलांच्या नावे असून, मुलाचे नाव सातबारावर लागलेले नाही. तर कबुलायतदार




जागांवर सरकारचे नाव लावलेले आहे. जे शेतकरी आहेत, परंतु त्यांचे नाव सातबारा किंवा इतर अधिकारात नाही, अशा शेतकऱ्यांच्या जमिनीची सर्व कागदपत्रे गोळा करून सहकार विभागाकडे पाठविण्यात येणार आहेत. यासाठी एक स्वतंत्र फॉरमॅट तयार करून सर्व जिल्हाधिकाऱ्यांकडून

### हजारो शेतकरी अद्याप फार्मर आयडी पासून वंचित

सातबारा नसलेल्या शेतकऱ्यांना पीककर्ज मिळत नाही आणि घेतलेल्या कर्जाला कर्जमाफीचा लाभही मिळत नाही. एकट्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात १,२०७ शेतकऱ्यांचे फार्मर आयडी अद्याप निघालेले नाहीत. तर राज्यातील ही संख्या २ लाख ३१ हजार आहे.

१५ दिवसांत अहवाल मागविण्यात यावा, असे निर्देश बावनकुळे यांनी दिले आहेत. त्यामुळे लवकरच याबाबतचे अंतिम आदेश निर्गमित केले जातील. ज्या शेतकऱ्यांकडे देवस्थान, कबुलायतदार, इनाम किंवा वतन जमिनी आहेत, त्यांनाही सर्व शासकीय सुविधा मिळाव्यात या उद्देशाने एक विशेष फॉर्म तयार करण्यात येणार आहे. यामुळे भविष्यात या शेतकऱ्यांनाही ॲग्रीस्टॅक काढण्यासाठी मोठी मदत होणार आहे. सहकार आयुक्तांनी स्पष्ट केले आहे की, पात्र शेतकऱ्यांची यादी लावण्यात आली असून, ज्यांचे ॲग्रीस्टॅक निघू शकत नाही, त्यांच्याकडून इतर पर्यायी कागदपत्रे घेऊन मार्ग काढण्यात येईल.

# ऱ्होड आयलँड रेड जातीच्या कोंबड्या पाळा

## अंडी-चिकन व्यवसायात दुप्पट नफा!



शेतकरी अधिक नफा मिळविण्यासाठी शेतीसोबतच इतर व्यवसाय करत असतात. जेणेकरून त्यांना शेतीतून दुहेरी आर्थिक उत्पन्न मिळवण्याची अपेक्षा असते. आजकाल ग्रामीण भागात शेतकरी कुक्कुटपालन व्यवसायाचा अवलंब करत आहेत. विशेष म्हणजे चांगल्या जातीच्या कोंबड्यांचे संगोपन करून, शेतकरी वर्षानुवर्षे चांगले पैसे कमवू शकतात. त्यामुळे आता तुम्हीही कुक्कुटपालन व्यवसाय करायचा असेल तर 'होंड आयलँड रेड' कोंबडी तुमच्यासाठी एक चांगला पर्याय ठरू शकते. अनेक शेतकऱ्यांना पोल्ट्री व्यवसायामध्ये उतरून अधिकचा नफा मिळवण्याची अपेक्षा असते. मात्र, त्यासाठीचे भांडवल, सर्व खर्च, उत्पन्न आणि चांगल्या जातीची कोंबड्यांची माहिती नसल्याने त्यांना त्यातून नफा मिळत नाही. जर तुम्हालाही चांगल्या जातीच्या कोंबड्यांचे संगोपन करून फायदा मिळवायचा असेल. तर तुम्ही नक्कीच 'होंड आयलँड रेड' जातीच्या कोंबड्या पाळू शकतात.

वर्षाला २९० ते ३०० अंडी : 'ऱ्होड आयलँड रेड' ही कोंबडी ऑस्ट्रेलियन जातीची आहे. ज्याची अंडी उत्पादन क्षमता प्रति वर्ष २९० ते ३०० अंडी आहे. याउलट देशी जातीची कोंबडी वर्षाला १०० ते १५० अंडी देते. आरआयआर ही अंडी उत्पादनासाठी सर्वोत्तम जात मानली जाते. या जातीची कोंबडीची पिल्ले अंडी घालण्यासाठी फार लवकर विकसित होतात. या जातीची कोंबडी तुम्ही घराच्या मागेही सहज पाळू शकतात. या जातीच्या कोंबडीची रोगप्रतिकारक शक्ती देखील चांगली असते. ज्यामध्ये आजारी पडण्याची शक्यता खूपच कमी असते. बाजारपेठेत सर्वाधिक मागणी : ऱ्होड आयलँड रेड कोंबडी एका वर्षात सुमारे ३०० अंडी देते. ज्याची किंमत भारतीय बाजारपेठेत खूप जास्त आहे. तसे पाहिले तर या जातीच्या कोंबडीचे अंडी १० ते १२ रुपयांना प्रति मग विकले जाते. दुसरीकडे, इतर जातींच्या कोंबडीच्या अंड्याची किंमत सात ते आठ रुपयांपर्यंत आहे. त्याच वेळी त्याच्या मांसाची किंमत देखील बाजारात सर्वाधिक आहे. अशा परिस्थितीत तुम्ही आरआयआर जातीच्या कोंबडीचे पालन करून चांगला नफा मिळवू शकतात.

# अननसाच्या पानांपासून गाई-म्हशींसाठी पौष्टिक चारा

शेतीसोबतच पशुपालन करून शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यासाठी शासनाकडून अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात येत असून त्यातून त्यांना लाभ मिळत आहे. भारतातील दुधाचे उत्पादन दुधाच्या मागणीच्या प्रमाणात कमी असल्याने देशातील दुधाचे उत्पादन वाढविण्याच्या दिशेने सरकार प्रयत्नशील आहे. दूध उत्पादन वाढवण्यासाठी शेतकरी हंगामानुसार जनावरांना हिरवा व सुका चाराही देतात.परंतु पौष्टिक चाऱ्याच्या कमतरतेमुळे जनावरांच्या दूध उत्पादनावर परिणाम होत आहे. दुभत्या जनावरांना कोणत्याही प्रकारचा चारा देता येत नाही, कारण त्यांची दूध उत्पादन करण्याची क्षमता चाऱ्यावर अवलंबून असते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्यासाठी त्यांना पोषक चारा देणे अत्यंत गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) अननसाच्या पानांपासून पौष्टिक चारा बनवण्याची पद्धत सुचवली आहे, ज्यामुळे जनावरांचे दूध उत्पादन एक ते दीड किलोने वाढू शकते. विशेष म्हणजे हा चारा जनावरांच्या आरोग्यासाठी तर चांगला आहेच पण दुधाचे प्रमाण वाढवण्यासही उपयुक्त आहे.

चाऱ्यात अननसाच्या पानांचा वापर : भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या म्हणण्यानुसार अननसाची पाने शास्त्रोक्त पद्धतीने जतन करून चारा बनवता येतो. या चाऱ्याला टोटल मिक्स्ड रेशन म्हणतात. या एकूण मिश्र रेशनमध्ये अनेक खाद्यपदार्थ एकत्र मिसळून जनावरांना खायला दिले जातात.



टीएमआरमध्ये चाऱ्यासोबत संपूर्ण कापूस सरकी, धान्ये, प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्त्वे मिसळून गायी आणि म्हशी दुभत्या जनावरांसाठी खाद्य तयार केले जातात. याप्रमाणेच अननसाच्या पानांचाही टीएमआर पशुखाद्य तयार करण्यासाठी वापर केला जाऊ शकतो. केरळमधील एर्नाकुलममध्ये अननसाच्या पानांचा वापर जनावरांचा चारा बनवण्यासाठी केला जात आहे. केरळमध्ये अननसाची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. अशा परिस्थितीत जनावरांचा चारा बनवण्यासाठी त्याची पाने वापरली जात आहेत. पौष्टिक चारा बनवण्याची पद्धत : आयसीएआरनुसार, सर्वप्रथम अननसाच्या पानांची वर्गवारी करावी. कापलेली किंवा खराब झालेली पाने त्यातून काढून टाकावीत. आता फक्त १०० किलो चांगली पाने घ्या आणि त्यात २ किलो गूळ मिसळा. या मिश्रणात अर्धा किलो मीठ देखील घालायचे आहे. आता हे संपूर्ण मिश्रण हवाबंद भांड्यात बंद करून ठेवावे. हा टीएमआर काही दिवसात तयार होईल. हा जनावरांसाठी अत्यंत सकस चारा असल्याचे सांगितले जाते.

अननसाच्या पानांचा चारा देण्याचे प्रमाण : अननसापासून तयार केलेला हा चारा जनावरांना एका दिवसात ५ ते १० किलो खाऊ घालू शकतो. त्याचे प्रमाण वाढवण्यासाठी त्यात अधिक गवत वगैरे घालता येईल. या टीएमआरमध्ये गवत, कोरडा चारा आणि धान्य मिसळून तुम्ही तुमच्या जनावरांना खाऊ शकता.असे वाढते दुधाचे प्रमाण : अननसात व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते. याशिवाय यामध्ये व्हिटॅमिन ए, बी ६, ई आणि के देखील असते. यामध्ये कॅल्शियम, फोलेट, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम आणि झिंक असते. त्यात पोषक तत्वे मुबलक प्रमाणात आढळतात. अशाप्रकारे, त्याच्या पानांमध्ये देखील भरपूर पोषक असतात जे प्राण्यांच्या आरोग्यासाठी चांगले असतात. अननसाची पाने चारा म्हणून दिल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहते आणि त्याची दूध देण्याची क्षमताही वाढते. अननसाच्या पानांचा चारा दिल्यास जनावरांचे दूध उत्पादन एक ते दीड लिटरने वाढू शकते, असे सांगितले जात आहे. त्याचबरोबर दुधातील फॅटचे प्रमाणही ०.३ ते ०.५ टक्क्यांनी वाढू शकते. एकंदरीत अननसाच्या पानांपासून बनवलेला चारा हा जनावरांसाठी उत्कृष्ट चारा ठरू शकतो.




### महत्वाच्या घटना

१६६० : मुघल फौजांनी संग्रामगड (चाकणचा किल्ला) ताब्यात घेतला.
१८६२ : कलकत्ता उच्च न्यायालयाची स्थापना
१८६२ : मुंबई उच्च न्यायालयाची स्थापना
१८९३ : मोटर वाहनांची नोंदणी सुरू करणारा फ्रान्स हा पहिला देश बनला.
१९४३ : नागपूर विद्यापीठाने स्वातंत्र्यवीर सावरकर यांना सन्माननीय डी. लिट. पदवी दिली.
१९४५ : दोन अणुबाँबच्या भयावर संहारामुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला.
१९४७ : भारताच्या घटनासमितीने सत्ता स्वीकारण्याचा ठराव मंजूर केला आणि लॉर्ड माऊंटबॅटन यांची स्वतंत्र भारताचे पहिले गव्हर्नर जनरल म्हणून नेमणूक केली.
१९४७ : पाकिस्तानला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९५८ : 'एअर इंडिया'ची दिल्ली मॉस्को विमानसेवा सुरू झाली.
१९७१ : बहारीनला (युनायटेड किंग्डमपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
२००६ : श्रीलंकेच्या वायुदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात चेन्चोलाई येथे ६१ तामिळ मुली ठार झाल्या.
२०१० : पहिल्या 'युवा ऑलिम्पिक स्पर्धा' सिंगापूरमधे घेण्यात आल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७७ : हान्स क्रिस्टियन ओरस्टेड डॅनिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ मार्च १८५१)
१९०० : महाराष्ट्रीयन ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी,पत्रकार, अभ्यासक आणि वक्ते एस. के. पाटील यांचा जन्मदिन.
१९०७ : गोदावरी परुळेकर मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्या, सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका. महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री वकील म्हणून त्यांनी सनद मिळवली. तलासरी, डहाणू, शिरगाव या भागातील डोंगरदऱ्यांत फिरून वारल्यांच्या पिळवणुकीचे अनुभव त्यांनी ऐकले व आदिवासींमधे जागृतीचे कार्य केले. 'जेव्हा माणूस जागा होतो' हे त्यांचे पुस्तक वेगळ्या जगाची ओळख करुन देणारे आहे. (मृत्यू: ८ आक्टोबर १९९६)
१९११ : वेदतिरी महाऋषी भारतीय तत्त्वज्ञानी (मृत्यू:)
१९२३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय पत्रकार, सिंडिकेटेड स्तंभलेखक, मानवाधिकार कार्यकर्ते, लेखक आणि युनायटेड किंगडमचे माजी उच्चायुक्त कुलदीप नायर यांचा जन्मदिन.
१९२५ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (मृत्यू: १६ सप्टेंबर १९९४)
१९५७ : जॉन प्रकाश राव जनुमला ऊर्फ 'जॉनी लीवर' विनोदी अभिनेता
१९६२ : रमीझ राजा पाकिस्तानी क्रिकेटपटू व समालोचक
१९६८ : प्रवीण आम्रे क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५८ : जीन फ्रेडरिक जोलिओट मूलद्रव्याच्या समस्थानिकांच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक (१९३५) मिळवणारा फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (जन्म: १९ मार्च १९००)
१९८४ : कुस्तीगीर खाशाबा दादासाहेब जाधव १९५२ च्या हेलसिंकी ऑलिम्पिकमधे वैयक्तिक पदक मिळवणारे पहिले भारतीय, शिवछत्रपती पुरस्कार मरणोत्तर (जन्म: १५ जानेवारी १९२६)
१९८८ : एन्झो फेरारी रेस कार निर्माते आणि ड्रायव्हर (जन्म: १८ फेब्रुवारी १८९८)
२०११ : शम्मी कपूर हिन्दी चित्रपट अभिनेता व निर्माता (जन्म: २१ आक्टोबर १९३१)
२०१२ : विलासराव देशमुख महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री (जन्म: २६ मे १९४५)
२०१७ : प्रसिद्ध भारतीय कवी व साहित्यकार चंद्रकांत देवताले यांचे निधन.

# कापसावर मावा-पांढरी माशी रोखण्यासाठी मित्र कीड नैसर्गिक उपाय

कापूस पिकावर मावा, पांढरी माशी, थ्रिप्स, तुडतुडे यांसारख्या विविध किडींचा प्रादुर्भाव होत असतो. या किडींवर नियंत्रण मिळविण्यासाठी शेतकरी अनेकदा कीटकनाशकांची फवारणी करतात. मात्र, प्रत्येक कीड हानिकारक नसते. निसर्गात काही उपयुक्त भक्षक कीडी हानिकारक किडींवर उपजीविका करून पिकाचे संरक्षण करतात. अशा कीडींना मित्र कीडी म्हटले जाते. कापूस पिकामध्ये या मित्र कीडींचे संवर्धन केल्यास हानिकारक किडींची संख्या नैसर्गिकरीत्या कमी करण्यास मदत होते. परिणामी कीटकनाशकांच्या फवारण्यांची संख्या आणि खर्च कमी होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी मित्र कीडींची ओळख करून त्यांचे संवर्धन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

कापसाच्या मित्र कीडी : कापूस पिकामध्ये आढळणाऱ्या प्रमुख मित्र कीडींमध्ये लेडीबर्ड बीटल, क्रायसोपरला (ग्रीन लेसविंग), कोळी, होव्हर फ्लाय, प्रेइंग मॅंटिस आणि ड्रॅगनफ्लाय यांचा समावेश होतो. या कीडी विविध हानिकारक किडींवर भक्ष्य म्हणून उपजीविका करतात. त्यामुळे त्यांची संख्या शेतात टिकवून ठेवणे हे नैसर्गिक कीड व्यवस्थापनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

दररोज ५० ते १०० मावा फस्त : लेडीबर्ड बीटल ही कापूस पिकातील महत्त्वाची मित्र



कीड आहे. लाल किंवा पिवळ्या रंगाची आणि काळ्या ठिपक्यांची ही लहान कीड सहज ओळखता येते. लेडीबर्ड बीटल दररोज ५० ते १०० मावा खाते. अळीपासून प्रौढ अवस्थेपर्यंतच्या जीवनकाळात ती सुमारे ३०० ते ५०० माव्यांचे नियंत्रण करण्यास मदत करते. त्यामुळे शेतात मोठ्या प्रमाणावर माव्याचा प्रादुर्भाव झाल्यास ही मित्र कीड नैसर्गिकरीत्या उपयुक्त ठरू शकते.

क्रायसोपरलाची अळी, पांढरी माशी आणि मावा : क्रायसोपरला किंवा ग्रीन लेसविंग ही हिरव्या रंगाची नाजूक कीड आहे. तिची अळी हानिकारक किडींच्या नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजावते. क्रायसोपरलाची अळी मावा, पांढरी माशी आणि थ्रिप्स यांसारख्या किडींवर उपजीविका करते त्यामुळे शेतात या मित्र किडीची उपस्थिती दिसून आल्यास अनावश्यक कीटकनाशक फवारणी करून तिचा नाश होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे.

कोळीही कापसाचा मित्र : शेतात दिसणाऱ्या कोळ्यांकडे अनेकदा शेतकरी हानिकारक जीव म्हणून पाहतात. मात्र, अनेक प्रकारचे कोळी किडींचे नैसर्गिक भक्षक आहेत. कोळी जाळे विणून त्यात अडकणाऱ्या विविध किडींचा नाश करतात. त्यामुळे शेतातील कोळ्यांचे संवर्धन केल्यास हानिकारक किडींच्या संख्येवर नैसर्गिक नियंत्रण ठेवण्यास मदत होऊ शकते.

होव्हर फ्लायची अळी खाते मावा : होव्हर फ्लाय हीदेखील कापूस पिकासाठी उपयुक्त मित्र कीड आहे. तिची अळी हानिकारक माव्यावर उपजीविका करते. एका विकासकाळात होव्हर फ्लायची अळी ३०० ते ५०० मावा खाते. प्रौढ अवस्थेतील होव्हर फ्लाय परागीभवनासही मदत करते. म्हणून शेतात होव्हर फ्लाय आढळल्यास तिचे संवर्धन करणे फायदेशीर ठरू शकते.

प्रेइंग मॅंटिस : शक्तिशाली शिकारी : प्रेइंग मॅंटिस ही शक्तिशाली शिकारी कीड म्हणून ओळखली जाते. ती अळी, तुडतुडे, मावा यांसह विविध प्रकारच्या किडींना भक्ष्य बनवते. कापूस पिकातील हानिकारक किडींच्या नियंत्रणात या मित्र किडीचीही महत्त्वाची भूमिका आहे. त्यामुळे शेतातील जैवविविधता टिकवून ठेवणे आवश्यक आहे.

अनावश्यक फवारणी टाळा : मित्र कीडींचे संवर्धन करायचे असल्यास गरज नसताना कीटकनाशकांची फवारणी करणे टाळणे महत्त्वाचे आहे. व्यापक परिणाम करणाऱ्या कीटकनाशकांमुळे हानिकारक किडींसोबतच उपयुक्त मित्र कीडींचाही नाश होऊ शकतो. त्यामुळे कीड आणि तिची आर्थिक नुकसान पातळी लक्षात घेऊनच फवारणीचा निर्णय घ्यावा. कृषी विभागाच्या शिफारशीनुसार निवडक कीटकनाशकांचा वापर करणे अधिक योग्य ठरते.

बांधावर फुलझाडे लावा : मित्र कीडींना शेतात आश्रय आणि अन्न उपलब्ध होण्यासाठी बांधावर फुलझाडे आणि औषधी वनस्पतींची लागवड करता येते. यामुळे विविध उपयुक्त कीडींना पोषक वातावरण मिळू शकते. तसेच मित्र कीडींची अंडी, अळ्या आणि त्यांची निवासस्थाने असलेली पाने, फुले व झाडांच्या फांद्या अनावश्यकपणे नष्ट करू नयेत.

नीम अर्कासारखे जैविक उपाय : किडींच्या नियंत्रणासाठी उपलब्ध पर्यायांमध्ये नीम अर्कासारख्या जैविक कीटकनाशकांना प्राधान्य देण्याचा सल्ला कृषी विभागाने दिला आहे. मात्र, कोणत्याही जैविक किंवा रासायनिक उत्पादनाचा वापर करताना पिकाची अवस्था, किडीचा प्रादुर्भाव आणि शिफारशीत मात्रा यांचा विचार करणे आवश्यक आहे.

मित्र कीडींचे संवर्धन महत्त्वाचे : मित्र कीडींचे संवर्धन हा केवळ एका पिकावरील किडींचे नियंत्रण करण्याचा उपाय नसून समन्वित कीड व्यवस्थापनाचा महत्त्वाचा भाग आहे. यामुळे हानिकारक किडींची संख्या नैसर्गिकरीत्या कमी करण्यास मदत होते. कीटकनाशकांच्या फवारण्यांची संख्या कमी होऊ शकते.

उत्पादन खर्चात बचत होण्याची शक्यता असते. शेतातील जैवविविधता टिकून राहते. पर्यावरणावरील रासायनिक भार कमी होतो. शाश्वत व पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळते.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# अहिल्यादेवी होळकरांचे विचार जागरूक ठेवणे आवश्यक : प्रा. राम शिंदे

## चौंडी येथे २३१ वी पुण्यतिथी समारोह; लोककल्याणकारी कार्याचा आदर्श पुढे नेण्याचे आवाहन

जामखेड। प्रतिनिधी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यातून लोककल्याण, न्याय, समता, महिला सक्षमीकरण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श समाजासमोर ठेवला. त्यांच्या विचारांची आणि कार्याची ओळख नव्या पिढीला करून देण्यासोबतच समाजात त्यांच्या विचारांची जागरूकता कायम ठेवणे ही काळाची गरज आहे, असे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले. चौंडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २३१ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित समारोहात ते बोलत होते. यावेळी डॉ. अण्णासाहेब डांगे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रा. शिंदे म्हणाले,



अहिल्यादेवींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळत जनतेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. प्रजेच्या सुख-दुःखाची जाण ठेवणाऱ्या लोकमातेने सार्वजनिक सुविधांच्या विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यामुळे त्यांचे कार्य लोककल्याणकारी शासनव्यवस्थेचा आदर्श ठरले आहे.

सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळावा, गरजूंच्या अडचणी दूर व्हाव्यात आणि समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता यावे, यासाठी अहिल्यादेवींनी सातत्याने प्रयत्न केले. प्रशासनात पारदर्शकता, कर्तव्यनिष्ठा आणि संवेदनशीलता असावी, हा संदेश त्यांच्या कार्यातून आजही मिळतो, असेही प्रा. शिंदे यांनी सांगितले. नव्या पिढीला अहिल्यादेवींच्या जीवनकार्याची ओळख करून देण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये त्यांच्या कार्यावर आधारित उपक्रम, व्याख्याने, चर्चासत्रे, वाचन तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या विचारांचा अभ्यास करून 'लोककल्याण हेच खरे नेतृत्व' हा संदेश समाजमनात रुजविणे गरजेचे आहे. त्यांचे विचार हा केवळ इतिहासाचा वारसा नसून आजच्या आणि उद्याच्या समाजासाठी मार्गदर्शक मूल्ये आहेत. न्याय, सेवा, संवेदनशीलता, कर्तव्यनिष्ठा आणि लोककल्याणाची भावना जागृत ठेवून हा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी डॉ. अण्णासाहेब डांगे म्हणाले की, अहिल्यादेवींनी देशातील विविध धार्मिक व सांस्कृतिक स्थळांच्या विकासासाठी मोठे योगदान दिले. मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा, रस्ते तसेच यात्रेकरूंसाठी आवश्यक सुविधांची उभारणी करून त्यांनी सार्वजनिक हिताची व्यापक संकल्पना प्रत्यक्षात आणली. समाजातील विविध घटकांना जोडण्यासोबतच सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी आणि महत्त्वपूर्ण आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

## लातूर जिल्ह्यातील तब्बल २२ हजार ९६३ शेतकऱ्यांना १५९ कोटींचा निधी प्राप्त; आधार प्रमाणीकरणाची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन

लातूर। प्रतिनिधी

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पहिल्या टप्प्यात लातूर जिल्ह्यातील २२ हजार ९६३ पात्र शेतकऱ्यांसाठी तब्बल १५९ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १८ हजार ५८० शेतकऱ्यांसाठी १२२ कोटी ७१ लाख ५५ हजार ४९ रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. उर्वरित प्राप्त रक्कम ही राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर जमा करण्यात आली असून, अद्याप रक्कम न मिळालेल्या उर्वरित पात्र लाभार्थ्यांचा निधी लवकरच प्राप्त होणार आहे. तो निधी मिळताच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ वर्ग केला जाणार आहे, अशी माहिती जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था व्ही. एल. पोतंगले यांनी दिली.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत ज्या शेतकऱ्यांची कर्जे पूर्णपणे माफ होऊन खाती बेबाकी झाली आहेत, अशा शेतकऱ्यांना बेबाकी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यांना लवकरच आगामी हंगामासाठी नवीन पीक कर्ज वाटपाचा लाभ दिला जाणार आहे. शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पात्र शेतकऱ्यांच्या यादीत लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यांतील एकूण ८९४ गावांमधील ५४ हजार ३८८ शेतकऱ्यांचा समावेश आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ३५ हजार ३९७ आणि राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांचे १८ हजार ९९१ शेतकरी सभासदांचा त्यांच्या विशिष्ट क्रमांकासह या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. यापैकी जिल्ह्यातील ४० हजार ९ (७३.५६ टक्के) पात्र शेतकऱ्यांनी आपले आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. अद्याप १४ हजार ३७९ पात्र लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण प्रलंबित आहे. आधार प्रमाणीकरणानंतरच कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची नावे पात्र शेतकऱ्यांच्या यादीत ( समाविष्ट आहेत, त्यांनी विनाविलंब वि जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर स जाऊन आपली ग्रीस्टॅक नोंदणी व आधार अ प्रमाणीकरण प्रक्रिया तात्काळ पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था प्र श्री. पोतंगले यांनी केले आहे. आधार ( प्रमाणीकरणासाठी आधार कार्ड, कर्ज खात्याचे व बचत खात्याचे पासबुक, प्रद्ध यादीत नावापुढे नमूद असलेला विशिष्ट क्रमांक आवश्यक आहे.

# डॉ.एस.आर रंगनाथन यांचे भारतीय ग्रंथालय चळवळीत बहुमुल्य योगदान: प्राचार्य डॉ.चौरे

पाथर्डी । प्रतिनिधी

भारतामध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये झालेल्या विकासात भारतातील ग्रंथालय चळवळीत सर्वाधिक योगदान पद्मश्री डॉ.एस.आर रंगनाथन यांचे आहे त्यामुळे त्यांना भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक म्हणतात डॉ.एस. आर रंगनाथन यांनी ग्रंथालयशास्त्राच्या पाच मूलभूत सूत्रांची मांडणी केली ग्रंथ हे उपयोगाकरीता आहेत प्रत्येक ग्रंथाला वाचक मिळाला पाहिजे प्रत्येक वाचकाला ग्रंथ मिळाला पाहिजे वाचकांचा वेळ वाचला पाहिजे ग्रंथालय हे वर्धिष्णु आहे या पाच सूत्रांनी संपूर्ण जगात



ग्रंथालयशास्त्राच्या संदर्भात मान्यता मिळवली अशा जागतिक कीर्तीच्या पद्मश्री डॉ.रंगनाथन यांचे कार्य भारतीयांसाठी अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.बबन चौरे यांनी केले पाथर्डी शहरातील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या ग्रंथालयात डॉ.एस.आर रंगनाथन यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन प्रसंगी बोलत होते डॉ.चौरे म्हणाले आजच्या डिजिटल युगात व सोशल मिडीयाच्या काळातही ज्ञान मिळवण्याचा सर्वात विश्वासहार्य मार्ग म्हणजे ग्रंथालय होय ग्रंथालय हेही एक व्यवस्थापनशास्त्र असून त्याकडे समाजभिमुख दृष्टीने पाहिले जावे हा विचार सर्वप्रथम डॉ रंगनाथन यांनी मांडला माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगत युगामध्ये ग्रंथालये व ग्रंथपालांनी वाचकांना पुन्हा ग्रंथालयांकडे वळविण्यासाठी जोमाने प्रयत्न करणे आवश्यक आहे कोणत्याही प्राचीन किंवा वर्तमान विषयाचा अभ्यास करायचा असो विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा किंवा कोणत्याही साहित्याचा अभ्यास करायचा असो एखाद्या कर्तुत्वान माणसाचे चरित्र हवे आहे हे सर्व साहित्य मिळविण्याचे ठिकाण म्हणजे ग्रंथालय होय यावेळी ग्रंथपाल डॉ.किरण गुलदगड पर्यवेक्षक प्रा.सलीम शेख डॉ.अरुण राख डॉ.भगवान सांगळे प्रा.आशा पालवे प्रा.माया पवार अभिजीत आव्हाड सुनिता पालवे मेघा पोव्हरे गौरव एडके व विद्यार्थी उपस्थित होते.

जाहीर प्रगटन
**मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात,**
**किरकोळ दिवाणी अर्ज २८०/२०२६**
**प्रयागाबाई व इतर विरुध्द निरंक**
**मार्फत : अॅड. व्ही. एन. मस्के**

अर्जदार :- १. प्रयागाबाई ज्ञानोबा सानप, रा. सौताडा ता. पाटोदा जि. बीड. २. राजेंद्र ज्ञानोबा सानप, रा. सौताडा ता. पाटोदा जि. बीड. ३. भाउसाहेब ज्ञानोबा सानप रा. सौताडा ता. पाटोदा जि. बीड.

विरूध्द कोणीही नाही

मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत ज्ञानोबा बयाजी सानप, हे रा. मौजे सौताडा ता. पाटोदा जि. बीड. यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी ज्ञानोबा बयाजी सानप, यांचा मृत्यु दिनांक १४/०३/२०२३ रोजी मौजे सौताडा ता. पाटोदा जि. बीड. येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताचे आई यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार कं. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार कं. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत ज्ञानोबा बयाजी सानप, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ ऑगस्ट २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २८ सप्टेंबर २०२६.

आदेशसावरुन,
स्वाक्षरित
**सहाय्यक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, क. स्तर,
पाटोदा. ता. पाटोदा, जि. बीड.

स्वाक्षरित
**क. लिपीक**

# महानगरपालिकेत १३ ते १६ ऑगस्टपर्यंत ९०% शास्ती माफी योजना लागू

लातूर। प्रतिनिधी

कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या सुरूवातीपासूनच १००% मालमत्ता कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवून मालमत्ताधारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार चालू वर्षातील मालमत्ताधारकासाठी सूट व थकबाकीधारकासाठी शास्ती माफी योजना वेळोवेळी लागू करण्यात आली होती. परंतु वारंवार प्रशासनामार्फत आवाहन करूनही व सूट लागू करूनही काही मालमत्ताधारक प्रतिसाद देत नसल्याने सुरू केलेली जप्तीची धडक मोहीम देखील सुरूच राहणार आहे. परंतु तत्पूर्वी थकबाकीदार मालमत्ताधारकांना संधी देण्याच्या दृष्टीने पुन्हा एकदा शास्ती माफी ची लागू करावी अश्या सूचना महापौर जयश्री सोनकांबळे व उपमहापौर अॅड. स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडाप्पले, सभागृहनेते विजयकुमार साबदे, विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांनी प्रशासनास दिल्या आहेत. त्यानुसार थकबाकीदारांना टॅक्स भरणा करण्याची संधी देण्याच्या दृष्टीने ९०% शास्ती माफी लागू करण्याचा निर्णय आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी घेतला आहे तेव्हा सर्व मालमत्ताधारकांना कळविण्यात येते की, दि. १३ ऑगष्ट ते १६ ऑगष्ट या कालावधीत आपल्याकडील थकीत कर एकरकमी भरल्यास आकारण्यात आलेल्या व्याज / शास्ती मध्ये ९० टक्के सूट देण्यात आली आहे. तसेच गुरुवार, शुक्रवार व रविवारी मनपा मुख्यकार्यालयात सांय ४ ते ८ यावेळेत विशेष वसुली कॅम्प आयोजित करण्यात येणार आहे.

जाहिर प्रगटन
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२२१४/२०२६**
**शारदा रामराव शिंदे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर**

पहा

शारदा रामराव शिंदे रा. नेकनूर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म शारदा रामराव शिंदे यांचा दिनांक ११/०८/१९६१ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १२/०८/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०९/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# उमरगा मुळकी येथे किशोरी मुलींचा मेळावा संपन्न

अहमदपूर । प्रतिनिधी

अहमदपूर तालुक्यातील उमरगा मुळकी येथे शांतिनिकेतन विद्यालयात पुकार संवेदना व संकल्प ग्रुप च्या वतीने किशोरवयीन मुलीचा मेळावा घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शोभाताई जगताप या होत्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुख्याध्यापक बंडगर सी एस संवेदना साथी दीपक कांबळे आनंद कंजे आशा कार्यकर्ती मिरा डोंगरे संगिता चलवाड बालीका आंबेगावे यांची उपस्थिती होती.



यावेळी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून या मेळाव्याची सुरुवात करण्यात आली यावेळी बोलताना संवेदना साथी दीपक कांबळे यांनी बाल अधिनियम २००५ बालकासाठी असलेल्या अधिकार यामध्ये जगण्याचा अधिकार विकासाचा अधिकार सहभागाचा अधिकार आणि संरक्षणाचा अधिकार यासंदर्भात उपस्थित किशोर मुलींना माहिती दिली मुला मुलीसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी कुटुंब समाज संस्था संघटना विविध शासकीय यंत्रणा समाजातील जाणकार व्यक्तीने मुलांच्या भविष्यासाठी मुलांना सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे गरजेचे आहे या संदर्भात आपले मत व्यक्त केले तर आनंद कंजे यांनी आरोग्य आणि शिक्षण किती महत्त्वाचे आहे आरोग्य असेल तर सगळ्यात मोठे धन संपत्ती आहे त्यामुळे आपल्या आरोग्याकडे प्रत्येकाने लक्ष दिले पाहिजे असे आवाहन केले यावेळी उपस्थित सर्व मुलींना संकल्प ग्रुपच्या सहाय्यक साथीनी किशोरवयीन मुली वयात आल्यानंतर होणारे शारीरिक बद्दल मासिक पाळी मासिक पाळीतील सुरक्षितता स्वच्छता या संदर्भात पोस्टर आणि बॅनरच्या माध्यमातून सविस्तर अशी माहिती दिली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हारीगीले बि डी यांनी केले तर उपस्थिताचे आभार श्रिमती बिराजदार जे एच यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गोळे ए एम आयतलवाड ए पी बळवंते जि एम सावंत डि एन जाधव सि व्हि निजवंते व्हि व्हि बिराजदार एस डी खंदारे के एस स्वामी पी एम चाटे जी जी सुर्यवंशी सि एम कुंरुदे पि जी नंदा गोरगिळे सरिता हंडे मनिषा राजपेठे सोनाली कल्ले विद्या वाघमारे सुलोचना कानवटे इत्यादींनी सहकार्य केले.

जाहिर प्रगटन
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२०६२/२०२६**
**विनोद संभाजी जाधव विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय लोणीघाट**

पहा

विनोद संभाजी जाधव रा. लोणीघाट ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म सार्थक विनोद जाधव यांचा दिनांक ०२/०८/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस लोणीघाट ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे लोणीघाट ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १२/०८/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०९/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२२१२/२०२६**
**शामसुंदर बबनराव शिंदे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर**

पहा

शामसुंदर बबनराव शिंदे रा. नेकनूर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म शामसुंदर बबनराव शिंदे यांचा दिनांक ०१/०६/१९७९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १२/०८/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०९/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन
**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२२१३/२०२६**
**सोनल भाऊसाहेब मोरे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर**

पहा

सोनल भाऊसाहेब मोरे रा. नेकनूर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म सोनल भाऊसाहेब मोरे यांचा दिनांक ३१/०७/१९८९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १२/०८/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०९/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# आनंद ऋषीजी जयंती उत्सव रथयात्रेने संपूर्ण शहर भक्तिमय

पाथर्डी । प्रतिनिधी

राष्ट्रसंत जैन धर्माचार्य आनंद ऋषीजी महाराज यांच्या १२७ व्या जयंती कार्यक्रमाला सर्व जाती धर्मातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला शहरातून निघालेल्या रथयात्रेमध्ये टिपरी नृत्य पथक विशेष लक्षवेधी ठरले आनंद ऋषीजी महाराजांची जन्मभूमी दीक्षाभूमी व कर्मभूमी पाथर्डी तालुका असल्याने येथील उत्सवाला विशेष महत्त्व असते संपूर्ण मिरवणूक मार्गावर रांगोळ्या रेखाटून विविध व्यापाऱ्यांनी स्वागत कमानी उभारल्या रस्त्याच्या दुतर्फा शहरवासी यांनी मिरवणूक पाहण्यासाठी मोठी गर्दी केली.

श्री तिलोक जैन परिवारातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आनंद ऋषीजी महाराजांचे गुरु रत्न ऋषीजी महाराज यांचे जन्मस्थान असलेल्या माणिकदौंडी येथून सकाळी रथयात्रेला प्रारंभ करण्यात आला ही रथयात्रा दुपारी पाथर्डी शहरात दाखल झाली शहरातील जय भवानी चौकातून मिरवणुकीला प्रारंभ होऊन विविध प्रकारचे चित्ररथ धार्मिक विचारांचे फलक ढोल पथक कलशधारी मुलींचे पथक लेझीम पथक वारकरी वेशभूषेतील टाळ पथक बँड पथक विविध रंगी आकर्षक वेशभूषा केलेले विद्यार्थी अत्यंत परिश्रम पूर्वक बसविलेले कार्यक्रम मिरवणुकीमध्ये सादर झाल्याने मिरवणूक अधिक आकर्षक ठरली चित्ररथाचे पूजन शंकर महाराज मठाचे मठाधिपती माधव बाबा मोहन सुडके महाराज नगराध्यक्ष अभय आव्हाड उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे गट नेत्या डॉ.शारदा गर्जे मुख्याधिकारी संतोष लांडगे राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे माजी नगरसेवक बंडू बोरुडे चांद मणियार श्री तिलोक मंडळाचे सचिव सतीश गुगळे सुरेश कुचेरिया राजेंद्र मुथा डॉ.ललित गुगळे डॉ.सचिन गांधी डॉ.अभय भंडारी चांदमल देसरडा कांतीलाल गुगळे माजी प्राचार्य डॉ.जी.पी. ढाकणे व डॉ अशोक दौंड संस्थेचे प्राचार्य अजय भंडारी सर्व कर्मचारी यासह विविध नगरसेवक सर्वपक्षीय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
शुक्रवार दि.१४ ऑगस्ट २०२६ | ६

# माजलगावात 'हर घर तिरंगा' रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## माजी खासदार डॉ प्रितमताई मुंडे यांच्या उपस्थितीत युवकांशी संवाद

माजलगाव । प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी,माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या वतीने दि १३ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजता शहरात 'हर घर तिरंगा,हर घर तिरंगा' भव्य मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या रॅलीला नागरिक आणि युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




माजलगाव शहरात दि १३ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजता झेंडा चौक येथून माजी खासदार डॉ प्रीतमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीला सुरुवात हातात तिरंगा घेऊन मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या युवकांनी शहरातून मोटारसायकल रॅली काढत देशभक्तीचा संदेश दिला.रॅलीचा समारोप छत्रपती संभाजी महाराज चौक येथे करण्यात आला. समारोपस्थळी माजी खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी उपस्थित युवकांशी संवाद साधला राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान आणि देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या रॅलीत भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते,युवक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. तिरंग्याच्या उपस्थितीने शहरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले.

### नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांची तातडीची दखल

या घटनेबाबत माजलगाव नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी तातडीने दखल घेत संबंधित यंत्रणा पाठवून विद्युत पुरवठा बंद करण्यास सांगतो, असे उत्तर दिले. त्यामुळे संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी विद्युत खांबाला करंट असल्याची बाब समोर आल्यानंतर संबंधित यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी धोकादायक विद्युत खांबांची तातडीने तपासणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

### धोकादायक विद्युत खांबामुळे प्रीतम मुंडे थोडक्यात बचावल्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'हर घर तिरंगा' अभियानाच्या पार्श्वभूमीवर माजलगाव शहरात दि १३ ऑगस्ट गुरुवार रोजी माजी खासदार प्रीतम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ रॅलीदरम्यान विद्युत खांबाला करंट असल्याचे निदर्शनास आल्याने मोठा अनर्थ टळला. रॅलीच्या मार्गावरच विद्युत खांबाला विद्युत प्रवाह असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. प्रसंगावधान राखल्याने संभाव्य दुर्घटना टळली आणि माजी खासदार प्रीतम मुंडे यांच्यासह रॅलीतील नागरिक थोडक्यात बचावले. या गंभीर प्रकारामुळे सार्वजनिक कार्यक्रमाच्या मार्गाची पूर्वतपासणी आणि विद्युत सुरक्षेची पाहणी करण्यात आली होती का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित अशा संवेदनशील बाबीकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यात मोठी दुर्घटना घडू शकते.

# बसमध्ये चोरी करणाऱ्या महिलेला एलसीबीने ठोकल्या बेड्या, दिड लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बसमध्ये घडलेल्या चोरीच्या प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेने यशस्वीरित्या छडा लावला आहे. मौजे मोरगाव येथील फिर्यादी आसाराम बाबासाहेब कागदे यांच्या पत्नीची गळ्यातील सोन्याची एक तोळ्याची पोत चोरणाऱ्या महिलेला पोलिसांनी अटक केली आहे.

दि. १२ ऑगस्ट २०२६ रोजी



सकाळी ९:०० च्या सुमारास फिर्यादी आपल्या पत्नीसह देवदर्शनासाठी माजरसुंबा पुलाखाली बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील सोन्याची पोत (मण्यासह) चोरली होती. याप्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (भा.न्या.सं.) कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# पतीने पेट्रोल ओतून पत्नीला पेटवलं ; पिंपळनेर परिसरातील मन सुन्न करणारी घटना

बीड । प्रतिनिधी

पिंपळनेर परिसरात कौटुंबिक वादातून पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने तिच्या अंगावर पेट्रोल ओतून पेटवून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत गंभीररीत्या भाजलेल्या अनुष्का शिरसाट यांचा छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी पोलिसांना दिलेल्या जबाबात अनुष्का यांनी पती मिलिंद शिरसाट याच्याकडून




होत असलेल्या छळाची धक्कादायक माहिती दिली. तसेच, 'साहेब, त्याला जन्मठेप द्या', अशी मागणीही त्यांनी पोलिसांकडे केली होती. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, पोलिसांनी फरार झालेल्या आरोपी पतीला बीडमधून अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

मुलाच्या डोळ्यांसमोर पेट्रोल ओतून पेटवले

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळनेर येथे कौटुंबिक वादातून ही घटना घडली. पती मिलिंद शिरसाट हा पत्नी अनुष्का यांच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याचा आरोप आहे. या संशयातून त्यांच्यात वारंवार वाद होत असल्याचे समोर आले आहे. ७ ऑगस्ट रोजी झालेल्या वादानंतर मिलिंदने अनुष्का यांच्या अंगावर पेट्रोल ओतले आणि त्यांना पेटवून दिल्याचा ◀◀ पान २ वर

# आजपासून नगरपरिषदेसमोर बांधकामगार सेनेचे आमरण उपोषण; बोगस गुंठेवारी आणि भ्रष्टाचार उघड करणार!

माजलगाव । प्रतिनिधी

नगरपरिषद क्षेत्रातील बोगस गुंठेवारी, बनावट नकाशे, पीटीआर आणि नगरउत्थान योजनेतील निकृष्ट कामांविरोधात महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेना आता थेट आरपारच्या लढाईसाठी सज्ज झाली आहे. दोषी अधिकारी, लिपिक आणि 'ताज कन्स्ट्रक्शन' कंत्राटदारावर गुन्हे दाखल करण्यासाठी तालुकाध्यक्ष नवीदोदिन मुस्ताक सिद्दिकी आज दि १४ ऑगस्ट रोजी नगरपरिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाला बसणार आहेत.




गेल्या दीड वर्षांपासून या महाघोटाळ्याविरोधात सिद्दिकी यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांचे चौकशी व कारवाईचे स्पष्ट आदेश असतानाही नगरपरिषद प्रशासनाने हेतुपरस्पर डोळेझाक केली. प्रशासनाच्या याच उदासीनतेविरोधात अखेर आंदोलनाचे हत्यार उपसण्यात आले आहे. या उपोषणादरम्यान भ्रष्टाचाराचे सर्व पुरावे, फोटो, व्हिडिओ आणि बोगस दस्तऐवज जाहीर केले जाणार असून, दोषींवर गुन्हे दाखल होईपर्यंत मागे हटणार नाही, असा ठाम निर्धार सिद्दिकी यांनी व्यक्त केला आहे.

# पालवन-देवराई सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या कामास अखेर सुरुवात

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पालवन चौकपालवनदेवराई या महत्त्वपूर्ण सिमेंट कॉंक्रीट रस्त्याच्या रखडलेल्या कामास अखेर सुरुवात झाली आहे. वंचित बहुजन आघाडीचे मा. जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सातत्याने पाठपुरावा करून प्रशासनाला धारेवर धरल्यानंतर या कामास गती मिळाली आहे.

या रस्त्याचा परिसरातील तब्बल ५० ते ६० गावांशी संपर्क असल्याने तो नागरिकांच्या दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, रस्त्याची एक बाजू पूर्ण केल्यानंतर दुसरी बाजू अपूर्ण ठेवण्यात आली होती. तसेच पूर्ण झालेल्या भागातील काही कामेही व्यवस्थित करण्यात आलेली नसल्याने



### वंचितचे अजय सरवदे यांच्या मागणीला यश

दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते.

विशेष म्हणजे, काम पूर्ण करण्याची निर्धारित मुदत संपूनही संबंधित हुले कन्स्ट्रक्शन, पाटोदा यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तोंडे यांनी कामास डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ दिल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यामुळे कंत्राटदाराकडून रस्त्याचे काम थांबविण्यात आले होते.

या प्रकाराविरोधात अजय सरवदे यांनी आक्रमक भूमिका घेत कार्यकारी अभियंता तोंडे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, दिलेली मुदतवाढ रद्द करावी आणि रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी केली होती. मागण्या मान्य न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांना काळे झेंडे दाखविण्याचा इशाराही देण्यात आला होता.

या इशाऱ्यानंतर प्रशासकीय पातळीवर ◀◀ पान २ वर

# भाजप नेते चंद्रकांत फड यांनी दिला पर्यावरण मंत्री ना.पंकजाताईंना 'बोन्साय' प्रजातीचा वड, पिंपळ

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसानिमित्त बीडचे भाजप जिल्हा कोषाध्यक्ष चंद्रकांत उर्फ मुन्ना फड यांनी मुंबईत गुरुवारी (दि.१३) अनोखी आणि पर्यावरणपूरक भेट दिली. त्यांनी पंकजाताईंना 'बोन्साय' प्रजातीचे वड, पिंपळाचे झाड भेट म्हणून देण्यात आले.



सध्याच्या काळात वाढदिवस किंवा इतर कार्यक्रमांना महागड्या वस्तू देण्याची प्रथा असताना, पर्यावरण मंत्री असलेल्या पंकजाताईंना थेट 'अनोखी हिरवी भेट' देऊन चंद्रकांत फड यांनी समाजात सकारात्मक संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नितीन फड, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष भारत तोंडे, केशव बडे, संतोष खवतड, बारीक कडेकर, नाबाजी दराडे आदींची उपस्थिती होती. या अनोख्या भेटीबद्दल पंकजाताई मुंडे यांनी चंद्रकांत फड यांच्यासह सहकाऱ्यांचे कौतुक केले. मुंबईत मुंडे यांच्या शासकीय निवासस्थानी ठेवलेले 'बोन्साय' प्रजातीचा वड, पिंपळ या आकर्षक झाडांनी लक्ष वेधले होते. विशेष म्हणजे, भेट दिलेली झाडे अतिशय लहान असून २० वर्ष जुने आहेत. दरम्यान, यापूर्वी भाजपचे माजी सभापती विष्णू घुले, चंद्रकांत फड यांनी 'पुंगनूर' प्रजातीची शुध्द भारतीय गोवंश असलेली जगातील सर्वात लहान उंचीची गाय भेट दिली होती. त्या गायीचे अनेकदा पंकजाताईंनी पूजन देखील केलेले व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झालेले आहेत.

नेमकी काय आहे झाडांची 'बोन्साय' प्रजात?

भेटीचे मुख्य ◀◀ पान २ वर

# बीडमध्ये आजपासून भव्य "श्रावण महोत्सव"

## स्थानिक उद्योजकांना मोठे व्यासपीठ; नागरिकांनी खरेदीसाठी भेट देण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) आणि बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ''श्रावण महोत्सव २०२६'' या भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन १४ व १५ ऑगस्ट रोजी अमृत मंगल कार्यालय, बीड येथे करण्यात आले आहे. सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा महोत्सव नागरिकांसाठी खुला राहणार आहे.

या महोत्सवात महिला बचत गट, गृहोद्योग, लघुउद्योजक, कारागीर तसेच विविध व्यवसाय व सेवा क्षेत्रातील व्यावसायिक सहभागी होणार आहेत. कपडे, ज्वेलरी, मसाले, राख्या, फराळ, गृहउपयोगी वस्तू, हस्तकला उत्पादने आणि विविध सेवांची माहिती नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

अनेक जण घरातून किंवा छोट्या प्रमाणावर चांगला व्यवसाय करत असतात. मात्र त्यांना ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळत नाही. अशा उद्योजकांना प्रोत्साहन मिळावे, त्यांचा आत्मविश्वास वाढावा आणि अधिकाधिक लोकांपर्यंत त्यांची ओळख व्हावी या उद्देशाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. अशाच छोट्या उद्योगांमधून भविष्यात मोठे उद्योजक घडतात आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळते. या महोत्सवाच्या तयारीसाठी अमृत व चे पदाधिकारी आणि कार्यकर्ते गेल्या अनेक दिवसांपासून परिश्रम घेत असून संपूर्ण तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. महोत्सवाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, उद्योजक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती भेट देणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. बीडकर नागरिकांनी कुटुंबासह महोत्सवाला भेट द्यावी, स्थानिक उद्योजकांकडून खरेदी करावी आणि आपल्या जिल्ह्यातील व्यवसायांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. ''स्थानिक उद्योजकांना साथ देऊया, बीडची अर्थव्यवस्था मजबूत करूया'' हा संदेश या महोत्सवाच्या माध्यमातून देण्यात येणार आहे.

# जलसंधारण सप्ताहात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी

## एक रिल्स मातीसाठी, एक रिल्स पाण्यासाठी, एक रिल्स सुरक्षित भविष्यासाठी, जिल्ह्यात १५ ते २१ ऑगस्ट कालावधीत जलसंधारण सप्ताह

**बीड । प्रतिनिधी**

पाणी अडवा, पाणी जिरवा हा मूलमंत्र देत राज्यात जलसंधारणाची मोठी चळवळ उभी करणारे माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या उल्लेखनीय कार्याप्रित्यर्थ त्यांचा जन्मदिवस २१ ऑगस्ट हा जलसंधारण दिन म्हणून साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने जिल्ह्यात १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जलसंधारण सप्ताह आयोजित करण्यात आला असून महावॉकेथॉन, रिल्स स्पर्धेसह इतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी नागरिकांनी यात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात जलसंधारण दिन आणि सप्ताहाच्या नियोजनाची बैठक संपन्न झाली. या बैठकीस प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, आणि जलसंधारण विभागाचे कार्यकारी अभियंता एस.पी. लब्बा यांच्यासह विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.



जलसंधारणाचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी रिल्स स्पर्धेचे आयोजन केले आहे. यासाठी जिल्ह्यातील उत्कृष्ट कंटेंट क्रिएटर्स, नाम फाउंडेशन, ग्लोबल विकास ट्रस्ट तसेच गावांमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सरपंचांकडून रिल्स मागवल्या जातील.

पोलीस विभागाच्या सूचनेनुसार आणि समन्वयाने वॉकेथॉनचा मार्ग निश्चित केला जाईल. जलसंधारणाचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवविण्यासाठी रिल्स स्पर्धेचे आयोजन केले आहे. यासाठी जिल्ह्यातील उत्कृष्ट कंटेंट क्रिएटर्स, नाम फाउंडेशन, ग्लोबल विकास ट्रस्ट तसेच गावामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या सरपंचांकडून रिल्स मागविल्या जातील. रिल्स स्पर्धेत प्रामुख्याने ग्रामीण भागातील शाळांना प्राधान्य देऊन विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन यांनी यावेळी दिल्या. तसेच जलसंधारण सप्ताह यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, तरुणांनी आणि संस्थांसह अधिकारी-कर्मचाऱ्यांनी एकत्र यावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी, म्हणजेच १५ ऑगस्ट रोजी मुख्य शासकीय कार्यक्रमात जलसंधारणाची शपथ व आवाहनाचा कार्यक्रम योग्य समन्वयातून पार पाडला जाईल. क्युआर कोड आधारित ऑनलाईन नोंदणी, महा वॉकेथॉनमध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र. प्रत्यक्ष सहभागी व्यक्तीस टी-शर्ट, कॅप आणि मी जलदूत बॅज देण्यात येणार आहे. या महावॉकेथॉनमध्ये प्रथम पाच विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह जिल्हाधिकारी यांच्या हस्ते देण्यात येणार आहे. मृद व जलसंवर्धन रिल्स स्पर्धेत १५ ते ३० वर्ष वयोगटातील व्यक्तींना सहभाग घेता येईल. यामध्ये स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदाची इन्स्टाग्राम रिल्स तयार करावी व ती स्वत:च्या पब्लिक इन्स्टाग्राम अकाऊंटवर पोस्ट करावी. रिल्ससाठी माती संवर्धन, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धुप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जससंधारण पध्दती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजाचे संवर्धन-उद्याचे सुरक्षित भविष्य, आदि विषय आहेत. जिल्हास्तरावर महाराष्ट्र युवा जलदूत या नावाने प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्हासह प्रथम पुरस्कार २५ हजार रुपये, द्वितीय पुरस्कार १५ हजार रुपये आणि तृतीय पुरस्कार १० हजार रुपये देण्यात येणार आहे. अशी माहितीही यावेळी मृद व जलसंधारण विभागाकडून देण्यात आली.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26